रायगड, नवी मुंबई
रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३४५
www.ramprahar.com
बुधवार २ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

पावसाचा जोर वाढणार; हवामान खात्याचा अंदाज

पुणे : देशात जुलै महिन्यात सुमारे २८०.४ मिलीमीटर (१०६ टक्के) पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने जाहीर केला आहे. मान्सून लवकरच हिमालयाच्या पायथ्याशी स्थिर होत आहे. त्यामुळे जुलै महिन्यात सर्वत्र सरासरीपेक्षा जास्त पाऊस होईल. हवामान विभागाने जुलै महिन्याचा स्वतंत्र अंदाज जाहीर केला. यात म्हटले आहे की, भौगोलिकदृष्ट्या देशाच्या बहुतेक भागात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, ईशान्य आणि पूर्व भारत आणि दक्षिण द्वीपकल्पीय भाग आणि वायव्य भारताच्या काही भागात सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान, विषुववृत्तीय पॅसिफिक प्रदेशात सध्या सकारात्मक स्थिती भारतीय मान्सूनसाठी अनुकूल आहे. त्यामुळे या महिन्यात देशात ५ जुलैपासून चांगल्या पावसाची शक्यता आहे.

अंतरंग

सोशल मीडियाच्या माध्यमातून वयोवृद्ध महिलेची कुटुंबाशी भेट/२
माथेरानच्या वाहनतळात झाड पडून वाहनांचे नुकसान/५
आजपासून भारत वि. इंग्लंड दुसरी कसोटी/८

रवींद्र चव्हाण भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष

मुंबई : प्रतिनिधी

भाजपच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे आमदार व माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांची निवड झाली आहे. सध्या ते प्रदेश कार्याध्यक्ष म्हणून काम करत होते. मुंबई येथे मंगळवारी (दि. १) प्रदेशाध्यक्ष निवडीसाठी निरीक्षक असलेले केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांच्या उपस्थितीत चव्हाण यांची प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

मुंबईतील वरळी डोममध्ये झालेल्या या समारंभास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मावळते प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई अध्यक्ष व मंत्री आशिष शेलार, मंत्री चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, पंकजा मुंडे, शिवेंद्रसिंहराजे भोसले, अशोक उईके, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, माजी प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार यांच्यासह आजी माजी खासदार, आमदार, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे राज्याचे महसूलमंत्री झाल्याने भाजपच्या प्रदेश अध्यक्षपदासाठी रवींद्र चव्हाण यांचे नाव जवळपास निश्चित झाले होते. ते डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. जानेवारी २०२५मध्ये त्यांच्याकडे राज्याच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. याआधी ते देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री, तर एकनाथ शिंदे सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री होते. आता ते प्रदेशाध्यक्ष बनले आहेत. मान्यवरांनी नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मान्यवरांच्या उपस्थितीत बिनविरोध निवड; शुभेच्छांचा वर्षाव

आज भारतीय जनता पक्षाचा एक कार्यकर्ता महाराष्ट्र प्रदेशच्या अध्यक्षपदापर्यंत पोहचू शकला ही संघटनेची ताकद आहे. अशी ताकद भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याला मिळो यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन ही ग्वाही देतो. माझ्यावर विश्वास दाखवून प्रदेशाध्यक्षपदाची धुरा माझ्या हाती सोपवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शाह, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजप परिवारातील सर्व प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार!

–रवींद्र चव्हाण, प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र भाजप

स्वयंसेवक ते प्रदेशाध्यक्ष!

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक ते भाजपचे प्रदेशाध्यक्ष असा रवींद्र चव्हाण यांचा प्रवास राहिला आहे. ते भाजप युवा मोर्चातून राजकारणात आले. पुढे कल्याण–डोंबिवली महापालिकेत नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, चार वेळा आमदार, प्रदेश सरचिटणीस, कार्याध्यक्ष, मंत्रीपद अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. चव्हाण यांची निवड आगामी निवडणुकांसाठी महत्त्वाची आहे.

मोदी सरकार दोन वर्षांत ३.५ कोटी नोकऱ्या देणार

■ ईएलआय योजनेला मंजुरी

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

मोदी सरकारने एम्प्लॉयमेंट लिंक्ड इनसेंटिव्ह (ईएलआय) योजनेला मंजुरी दिली आहे. यानुसार येत्या दोन वर्षांत ३.५ कोटींहून अधिक रोजगार उपलब्ध केले जाणार आहेत. सर्वच क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मिती करणे, नोकऱ्यांची क्षमता वाढविणे यासह सामाजिक सुरक्षा वाढविण्याची तयारी केली जात आहे.

देशातील बेरोजगारी कमी करणे हे या ईएलआय योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. नवीन नोकरी करणाऱ्यांना म्हणजेच पहिल्यांदा नोकरी करणाऱ्यांना महिन्याचा पगार दोन टप्प्यांत दिला जाणार आहे. यासाठी १५ हजार रुपयांपर्यंतचा मासिक पगार गृहीत धरण्यात आला आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत माहिती दिली. दोन वर्षांत ३.५ कोटींहून अधिक रोजगार निर्मितीला प्रोत्साहन मिळणार असल्याचे ते म्हणाले. यासाठी त्यासाठी एक लाख कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सर्वांशी चर्चा करून ही योजना तयार करण्यात आली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात घोषणा केली होती, असे त्यांनी सांगितले.

या योजनेसाठी एकूण दोन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ४.१ कोटी तरुणांना रोजगार, कौशल्य आणि आर्थिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पंतप्रधानांच्या पाच योजनांच्या पॅकेजचा भाग म्हणून २०२४–२५च्या केंद्रीय अर्थसंकल्पात ईएलआय योजनेची घोषणा करण्यात आली होती. १.९२ कोटी लाभार्थी पहिल्यांदाच कामगार क्षेत्रात प्रवेश करतील. या योजनेचे फायदे १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२७दरम्यान निर्माण झालेल्या नोकऱ्यांना लागू होतील, असे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

राहुल गांधींचे निकटवर्तीय कुणाल पाटील भाजपमध्ये

मुंबई : धुळे जिल्ह्यात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. माजी आमदार कुणाल पाटील यांनी मंगळवारी (दि. १) भाजपमध्ये प्रवेश केला. पाटील हे काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे निकटवर्तीय मानले जातात, मात्र त्यांनी काँग्रेसला राम राम ठोकत कमळ हाती घेतले आहे.

मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री जयकुमार रावल, जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत कुणाल पाटील यांचा पक्षप्रवेश झाला.

निवडक

हिमाचल प्रदेशात ढगफुटी; चौघांचा मृत्यू, १६ जण बेपत्ता

मंडी : हिमाचल प्रदेशातील मंडीमध्ये ढगफुटीनंतर प्रचंड नुकसान झाले आहे. करसोग आणि धर्मपूरमध्ये ढगफुटीमुळे चार जणांचा मृत्यू झाला असून १६ जण बेपत्ता आहेत, तर ११७ जणांना वाचवण्यात यश आले आहे. अजूनही काही लोक बेपत्ता असल्याचे वृत्त आहे. परिसरात पावसाचा कहर पहायला मिळत असून रस्ते, पूल, घरे वाहून गेली आहेत.

उत्तराखंडमध्ये अतिवृष्टी; अडकलेल्या पर्यटकांची सुटका

डेहराडून : देवभूमी उत्तराखंडमध्ये गेल्या काही दिवसांपासून पावसाने थैमान घातले आहे. या ठिकाणी ढगफुटीसदृश्य पाऊस पडल्याने नद्यांना पूर आला असून दरडी कोसळून वाहतुकीचे रस्ते बंद झाले आहेत. यमुनोत्री धामच्या जानकीचट्टी गावात सुमारे १५० मराठी पर्यटक अडकून पडले होते. महाराष्ट्र सरकारच्या फोनवरून तेथील एनडीआरएफच्या पथकाने धाव घेऊन या पर्यटकांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे.

नाना पटोलेंचे निलंबन

मुंबई : प्रतिनिधी

विधानसभेत मंगळवारी (दि. १) झालेल्या गोंधळानंतर काँग्रेस आमदार नाना पटोले यांना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिवसभरासाठी निलंबित केले.

राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे व आमदार बबनराव लोणीकर यांच्या विधानाचा संदर्भ देत नाना पटोलेंनी याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात माफी मागितली पाहिजे, अशी मागणी केली. मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा बाप होऊ शकत नाही, असे वक्तव्य पटोले यांनी केले. यावर असंसदीय शब्दांचा उल्लेख केल्याबद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी पटोलेंना समज दिली, मात्र पटोले अध्यक्षांच्या खुर्चीजवळ जाऊन तावातावाने बोलू लागले. त्यांनी राजदंड उचलण्याचाही प्रयत्न केला. यानंतर ५ मिनिटांसाठी सभागृह स्थगित करण्यात आले. त्यानंतर कामकाज सुरू झाल्यावर विरोधकांनी पुन्हा गदारोळ सुरू केला.

एखाद्या विषयावर भावना व्यक्त करणे वेगळी गोष्ट आहे, पण थेट अध्यक्षांवर धावून जाणे अशोभनीय आहे. नाना पटोले स्वतः अध्यक्ष राहिले आहेत. त्यांनी असे वागणे योग्य नाही. पटोलेंनी माफी मागायला हवी, असे मुख्यमंत्री म्हणाले. यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी पटोलेंचे दिवसभरासाठी निलंबन करत असल्याचे जाहीर केले.

दरम्यान, केवळ चर्चेत राहण्यासाठी काँग्रेसच्या नाना पटोले यांनी पंतप्रधान मोदींचा एकेरी उल्लेख केला तसेच सभागृहातील राजदंड उचलण्याचा प्रयत्न केला असल्याची टीका राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. पंतप्रधान मोदींवर टीका करून चर्चेत राहता येते. त्यामुळे 'बाप तो बाप होता है' असा टोलाही शिंदेंनी पटोले यांना लगावला.

काशीद समुद्रात पर्यटक बुडाला

मुरूड : प्रतिनिधी

मुरूड तालुक्यातील काशीद येथील समुद्रात एक पर्यटक बुडाल्याची घटना मंगळवारी (दि. १) घडली. तनिष्क मल्होत्रा (वय २०, रा. बावधन, ता. हवेली, जि. पुणे) असे बुडालेल्या पर्यटकाचे नाव आहे.

पुण्यातील पाच युवक मुरूड तालुक्यातील प्रसिद्ध काशीद समुद्र किनारी फिरायला आले होते. पावसाळा असल्यामुळे सध्या काशीद येथील सर्व सेवा पर्यटकांसाठी बंद आहेत. असे असताना पदवीधर होण्यासाठी शेवटच्या वर्षात शिकत असणारे हे युवक समुद्रात पोहण्याची इच्छा निर्माण झाल्याने दुपारी पाण्यात गेले. या वेळी खवळलेला समुद्र व खोल पाण्याचा अंदाज न आल्याने यातील तनिष्क मल्होत्रा बुडाला. पोलीस व स्थानिकांकडून तनिष्कचा शोध सुरू आहे. दरम्यान, पर्यटनस्थळी जाताना पर्यटकांनी खबरदार घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

पाहणी

पनवेल : शहरातील कृष्णाळे तलावाला लागून असलेल्या जुन्या भाजी मार्केटमध्ये मंगळवारी मध्यरात्री भीषण आग लागून दोन दुकाने जळून खाक झाली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. या आगीत दुकानांचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी सकाळी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि परिस्थितीचा आढावा घेतला. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक गणेश कडू आदी उपस्थित होते. (संबंधित वृत्त पान ३ वर..)

'सीकेटी'च्या नव्या मांडोळेला प्राइड ऑफ भारत अवॉर्ड

पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील विद्यार्थिनी नव्या सचिन मांडोळे हिला अखिल भारतीय प्रतिभा सन्मान महासंमेलनात रेडियंट टॅलेंट बुकच्या वतीने शाल, ट्रॉफी व प्राइड ऑफ भारत अवॉर्ड २०२५ गौरवपत्र देऊन राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात आले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

मुंबई येथील भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृहात आयोजित या समारंभास देशभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. या वेळी नव्या हिने अप्रतिम नृत्य सादर करून आपली अदम्य क्षमता, कला सादर केली.

दरम्यान, राष्ट्रीय स्तरावरील नृत्य क्षेत्रातील पुरस्काराने सीकेटी विद्यालयाच्या नावलौकित भर घालणाऱ्या नव्याचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विशेष कौतुक करत शाब्बासकीची थाप दिली. या वेळी संस्थेच्या कार्यकारी संचालक मंडळाचे सदस्य संजय भगत, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे आदी उपस्थित होते.

पंढरपूर वारीदरम्यान मृत्यू झाल्यास वारकऱ्यांच्या कुटुंबियांना मिळणार मदत

मुंबई : प्रतिनिधी

आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलाच्या भेटीसाठी हजारो वारकरी शेकडो मैल अंतर कापत पंढरपुरात येतात. यंदा महाराष्ट्र सरकारने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून वारीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अपघातात वारकऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना सरकारकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. या संदर्भातील नवे परिपत्रक महसूल विभागाने मंगळवारी (दि. १) जारी केले.

पंढरपूर येथे वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विठ्ठल रखुमाई वारकरी योजना २०२५ राबवण्यात येत आहे. या निर्णयामुळे वारीदरम्यान घडणाऱ्या अनपेक्षित घटनांमध्ये वारकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक आधार मिळणार आहे. १६ जून ते १० जुलै या कालावधीत वारीदरम्यान जर एखाद्या वारकऱ्याचा अपघातामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबियांना चार लाखांची रक्कम मिळणार आहे. आत्महत्या, विषबाधा, खून वगळून इतर नैसर्गिक मृत्यू अपघाताने झालेल्या दुर्घटनांमध्ये ही आर्थिक मदत दिली जाईल. याशिवाय वारीदरम्यान अपघातामुळे अपंगत्व आल्यासदेखील आर्थिक मदतीची तरतूद आहे.

दरम्यान, गतवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील. वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल तसेच पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

नेरळजवळील जुना दगडी पूल वाहतुकीस बंद

रायगड : रामप्रहर वृत्त

जव्हार–वाडा–भिवंडी–कल्याण–कर्जत या राज्यमार्गावरील कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाण्यानजीकचा जुना दगडी पूल नादुरुस्त झाल्याने वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

या पुलाच्या स्ट्रक्चरल ऑडिट पाहणीदरम्यान कर्जतकडील बाजूस असलेल्या खांबाच्या तळातील काही भाग नादुरुस्त आढळून आला. त्यामुळे रस्ते वाहतूक तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने या पुलावरून वाहतूक तत्काळ बंद करण्यात आली आहे, असे सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेलचे कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण यांनी कळविले आहे.

दरम्यान, या पुलास समांतर नव्याने बांधलेला दुसरा आरसीसी पूल अस्तित्वात असल्याने वाहतूक त्या पुलावरून सुरू ठेवण्यात आली असून सद्यस्थितीत वाहतूक सुरळीत सुरू आहे.

अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतात महाराष्ट्राची भरारी -मुख्यमंत्री

मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्राने उर्जा क्षेत्रात गेल्या दोन-तीन वर्षात उल्लेखनीय काम केले असून येत्या काळात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताचे महत्त्व आणि आवश्यकता वाढणार आहे. त्या पार्श्वभूमीवर उदंचन जलविद्युत प्रकल्प (पंपस्टोरेज) हा अपारंपरिक ऊर्जा स्रोतात भर घालणारा उपयुक्त प्रकल्प आहे. सहकारातून अशा पद्धतीचा प्रकल्प पहिल्यांदाच राज्यात होत आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.



उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी (पंपस्टोरेज) जलसंपदा विभाग आणि तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी नवशक्ती निर्माण संस्था मर्यादित यांच्यात विधानभवन, मुंबई येथे सामंजस्य करार करण्यात आला, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार विनय कोरे यांच्यासह मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, वारणाचे एन. एच. पाटील आदी उपस्थित होते.

पंप स्टोरेज क्षेत्रात राज्य सरकारचा हा १६ वा सामंजस्य करार असून यातून १००८ कोटी रुपये गुंतवणूक होणार आहे. यातून २४० मेगावॉट वीजनिर्मिती होणार आहे.यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भविष्यातील वीजेचा वाढता वापर लक्षात घेता पंप स्टोरेज आवश्यक ठरणार असून त्याची वीज गरजेनुसार आणि आवश्यक तेवढ्या प्रमाणात वापरता येते. पंपस्टोरेजची उपयुक्तता लक्षात घेऊन राज्य शासनाने या संदर्भात ६५ हजार मेगावॅट क्षमतेचे सामंजस्य करार केले आहेत. अजून १ लाख मेगावॅट क्षमतेपर्यंत नेण्याचे शासनाचे नियोजन आहे. त्याचसोबत भविष्यातील पर्यायी व्यवस्था म्हणून मोठ्या प्रमाणात पारेषणात गुंतवणूक करुन २०३५ साली कॉरीडॉर उभे करावे लागणार आहेत, त्यादृष्टीने शासन पारेषणात एक लाख कोटींची गुतंवणूक करत आहे. या सर्वात पंप स्टोरेजची भूमिका महत्त्वपूर्ण असणार आहे. पश्चिम घाटामुळे पंपस्टोरेज निर्मितीसाठी अतिशय चांगली संधी प्राप्त झाली असून वारणा समूहाने ज्याप्रमाणे सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम करुन सहकारातील एक अग्रणी संस्था म्हणून वारसा निर्माण केला आहे. त्याचपद्धतीने या जलविद्युत प्रकल्पासाठी देखील ते भरीव योगदान देऊन प्रकल्प गतीमानतेने पूर्ण करण्यात पुढाकार घेतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

उदंचन जलविद्युत प्रकल्पाची वैशिष्ट्ये

उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी जलसंपदा विभाग आणि तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी नवशक्ती निर्माण संस्था मर्यादित यांच्यासमवेत सामंजस्य करार करण्यात आला. सार्वजनिक खाजगी भागीदारीद्वारे उदंचन जलविद्युत प्रकल्प उभा करण्याचे धोरण दि.२०.१२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. तिलारी उदंचन जलविद्युत प्रकल्पाद्वारे २४० मेगावॅट वीजनिर्मित्ती अपेक्षित आहे. त्यामध्ये रू. १००८ कोटी गुंतवणूक व ३०० मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार आहे. प्रकल्पाच्यावरील बाजूचे धरण हे तिलारी जलविद्युत प्रकल्पासाठीचे कोदाळी धरण (ता. चंदगड, जि. कोल्हापूर) असून खालील बाजुचे धरण मौजे केंद्रे (ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग) येथे आहे.

धोरणातील प्रमुख तरतूदी

जलाशयाचा वापर केल्यास प्रति जलाशय १.३३ लक्ष प्रती मेगावॅट प्रतिवर्ष भाडेपट्टी तसेच औद्योगिक दराप्रमाणे पाणी शुल्क आणि जागेचे वार्षिक भाडेपट्टी शुल्क प्रचलित दराप्रमाणे असणार आहे.यापूर्वी १५ अभिकरणासमवेत सामंजस्य करार करण्यात आले असून एकूण ४५ प्रकल्पाद्वारे ६२,१२५ मेगावॅट वीजनिर्मिती अपेक्षित आहे. त्यामुळे ३.४१ लक्ष कोटी इतकी गुंतवणूक व ९६,१९० मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार आहे.

या सर्व उदंचन योजनांसाठी प्रथम पाणीसाठ्याकरिता एकूण (सर्व योजनांकरिता) अंदाजे १४.६२ टीएमसी इतके पाणी आवश्यक असून प्रतिवर्षी पुर्नभरणासाठी २.०० टीएमसी पाणी आवश्यक आहे. उदंचन योजनांच्या धरणांसाठी प्रथम भरणासाठी औद्योगिक दरान सुमारे ५७९.६९ कोटी व प्रतिवर्ष पुनर्भरणासाठी सुमारे ८०.५२ कोटी महसूल स्वरुपात मिळणे अपेक्षित आहे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून वयोवृद्ध महिलेची कुटुंबाशी भेट

चौक : प्रतिनिधी

खालापूर पोलीस ठाणे अंतर्गत वावोशी दुरक्षेत्र हद्दीत वयोवृध्द महीला बेवारस स्थितीत फिरत असतांना आढळून आली होती. तिच्याकडून कोणतीच माहिती उपलब्ध होत नव्हती, त्यामुळे महाराष्ट शासनाचे महीला वसतिगृह दहीवली ता. कर्जत येथे ठेवण्यात आले होते.

सदर महीलेचे नातेवाईक यांचा तपास होणे करीता सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष औटी यांनी सोशल मिडीया, वॉट्स अप द्वारे कळवुन तीचे नातेवाईक यांचा शोध होण्यासाठी आवाहन केले होते. या महीलेचा मुलगा मयुर शरद देवस्थळे रा.सफाळे ता.जि. पालघर याने सोशल मिडीया वरील मेसेज पाहुन त्याची ती आई असल्याचे समजले.

सदर महीलेचा मुलगा खालापूर पोलीस ठाणे येथे आला. त्याने पोलीसांकडून माहिती घेऊन कर्जत येथे महिला शासकिय वसतीगृह येथे येऊन आपली आई शदर देवस्थळे वय ५५ रा. सफाळे ता. जि.पालघर हिला घेवुन जाणे करीता अधिक्षक महीला व बाल विकास विभाग यांना विनंती केली. कायदेशीर सोपासकर पूर्ण त्याने आपल्या आईला घरी नेले. सोशल मीडियाच्या माध्यमातून आज आपल्याला आई भेटल्याची प्रतिक्रिया दिली.

तीन वर्षे घरात कोंडून घेतलेल्या तंत्रज्ञाची सील आश्रमाच्या स्वयंसेवकांनी केली सुटका

पनवेल : वार्ताहर

नेरूळमध्ये ३ वर्षांहून अधिक काळ अमानुष परिस्थितीत जगत असलेल्या मानसिक आजारी व्यक्तीला सील आश्रमाने वाचवले. अनुपकुमार नायर (वय ५३) असे या व्यक्तीचे नाव आहे. नेरूळ येथील मल्याळी समाजाचे गोपकुमार यांनी सील आश्रमाला माहिती दिल्यावर त्यांनी नायर यांची सुटका केली.आई-वडील आणि भावाच्या निधनामुळे ते नैराश्यात गेल्याचे सांगण्यात येते.

नायर हे मागील तीन वर्षांपासून एकटेच घरकुल सीएचएस, सेक्टर २४ जुईनगर या ठिकाणी वास्तव्यास आहेत. त्यांना लागणारे जेवणाचे किंवा इतर सामान ते ऑनलाईनद्वारे मागवत होते. विशेष म्हणजे घरात असलेल्या एका खुर्चीवरच ते झोपत होते. त्यांनी आजवर पार्सल मागविलेल्या सामानाचा कचरा ते घरात टाकत होते. यामध्ये प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक कंटेनर तसेच बॉटल्सचा घरात खच पडला होता. विष्ठेमुळे अतिशय उम्र दर्प या घरातून येत होता. स्वयंसेवकांनी घरातून बाहेर काढून सील आश्रमात दाखल केले

नवी मुंबई महापालिकेचे ३६६.८० कोटींचे करसंकलन

नवी मुंबई : बातमीदार

महानगरपालिकेच्या मालमत्ताकर विभागाने सन २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षात पहिल्या तिमाहीमध्ये ३६६.८० कोटींचे करसंकलन करून करसंकलनामध्ये महानगरपालिकेच्या इतिहासामध्ये विक्रमी नोंद केली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने नागरिकाभिमुख उपक्रम राबविल्यामुळे व करसंकलनासाठी विविध पुढाकार घेतल्याने संकलनामध्ये विक्रमी वाढ झाली असून यामध्ये बचतगटांच्या महिला, मालमत्ताकर विभागाचे सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचारी आणि सर्वात महत्वाचे शहरातील जागरुक करदाते यांच्यामुळे करसंकलनाचा हा विक्रम साध्य झाला असून हे सर्वांचे यश असल्याचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी स्पष्ट केले असून करदात्या नागरिकांचे आभार मानले आहेत. आगामी काळामध्ये महानगरपालिकेने आता १ जुलैपासून विलंब दंड (शास्ती) प्रतिमाह २% लागू करण्यास सुरूवात केली आहे.

असा आला कर!

३ लाख ४७ हजार ७८८ करदात्यांपैकी १ लाख ०० हजार ५८७ एवढ्या करदात्यांकडून ३६६.६० कोटी करभरणा. ऑनलाईन पध्दतीने ६३ हजार ४८८ करदात्यांनी भरला तब्बल २२० कोटींचा कर (६६%) तिमाहीच्या शेवटच्या दिवशी तब्बल ९०.८४ कोटी कर संकलन. करसंकलनामध्ये घरपोच बिलांचा महत्त्वाचा वाटा; नेरूळ या वॉर्डमधून सर्वाधिक रू. ७४.१३ कोटी कर रक्कम. तब्बल ९९ हजार ७०३ करदात्यांनी घेतला सामान्य करावरील १०% सवलतीचा लाभ घेतलशहराच्या विकासामध्ये प्रत्येक करदात्याचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याने भरलेल्या करातूनच शहराचा विकास होतो. शहराच्या विकासासाठी प्रत्येक नागरिकाचा वेळेवर भरलेला कर हा विश्वासाचा भाग आहे.

आषाढी एकादशीला प्रवासी सेवेसाठी येणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन

मुंबई, : रामप्रहर वृत्त

आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५,२०० बसेसची व्यवस्था केली आहे. या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक, अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात यंदा स्वखर्चाने सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे. या निमित्ताने माणसातील विठुरायाची सेवा करण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम राबविणार असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

आषाढी वारीच्या काळात ५,६ व ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग बसस्थानक येथे सुमारे १३ हजार एसटी कर्मचारी या मोफत भोजन व्यवस्थेचा लाभ घेतील.

नेरळमध्ये डॉक्टर डेनिमित्त आरोग्य, नेत्र तपासणी आणि रक्तदान शिबिर

नेरळ : प्रतिनिधी

डॉक्टर डे (१ जुलै) निमित्त रायगड मेडिकल असोसिएशन व कर्जत मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने धारप हॉल, उंबरवाडी, नेरळ येथे रक्तदान, सामान्य आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरास १०० पेक्षा जास्त नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान धन्वंतरी व गणपती पूजनाने झाली. यानंतर दीपप्रज्वलन, स्वागत भाषण व मार्गदर्शनपर मनोगते झाली.डॉ. प्रशांत गांगल, सचिव, रायगड मेडिकल असोसिएशन यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर डॉ. आशुतोष कुळकर्णी ,अध्यक्ष, रायगड मेडिकल असोसिएशन यांनी प्रास्ताविक करत उपक्रमाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला.डॉ. आशिष कर्वे यांनी दोन्ही संघटनांच्या सामूहिक प्रयत्नांची प्रशंसा केली.

यावेळी सायकल वारीतील उल्लेखनीय सहभागासाठी डॉ. नागेश चित्ते व डॉ. शरद तोडमल यांचा सन्मान करण्यात आला.आरोग्यम धनसंपदा जीवनगौरव पुरस्कारप्राप्त डॉ. प्रेमचंद जैन यांचाही गौरव करण्यात आला. यावेळी ४५ जणांनी उत्साहाने रक्तदान केले

या उपक्रमात अनील आय हॉस्पिटल, रायगड मेडिकल सेंटर ब्लड बँक, आणि लार्सन टुब्रो ट्रस्ट चे डॉ. संजय भामेरे, तसेच कर्जत मेडिकल असोसिएशनचे डॉ दिलीप सावळे डॉ. आदिती कर्वे, डॉ. शीतल कराळे, डॉ. शर्वाणी कुळकर्णी, डॉ. विकास गोमारे, डॉ. महेश शिरसाट, डॉ. निलेश म्हात्रे, डॉ. आदित्य जंगम, डॉ हेमंत शेवाळे, डॉ. गणेश साळुंखे, डॉ. श्रीकांत डहाके, डॉ. सुहास शितुत, डॉ. बी. जी. लाड व डॉ. (सौ.) गंगोलिया यांनी सक्रिय सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ.कुणाल राठोड यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. जयश्री देशमुख यांनी केले. हा उपक्रम आरोग्यप्रेमी आणि समाजाभिमुख डॉक्टर्सच्या सेवाभावाचे मूर्त स्वरूप ठरले.

गायकवाड कुटुंबियांकडून आषाढी वारीतील वारकऱ्यांसाठी भोजन व्यवस्था

पाली : प्रतिनिधी

रायगडच्या पनवेल शिवकर येथून वारीसाठी जाणाऱ्या पालखीतील वारकऱ्यांसाठी प्रसाद लक्ष्मण गायकवाड यांनी एक सामाजिक कार्य व वारकऱ्यांची सेवा म्हणून भोजन व्यवस्था केली. प्रसाद गायकवाड मागील पाच वर्षांपासून हा उपक्रम न चुकता राबवत आहेत.

फलटण येथे वारीचा मुक्काम असतो आणि यावेळी प्रसाद गायकवाड वारकऱ्यांना अन्नदान करतात. यावेळी प्रसाद गायकवाड त्यांची पत्नी अर्चना व मुलगा वेदांत यांनी स्वतः वारकऱ्यांना जेवण वाढले. सर्वांनी आवर्जून वारकऱ्यांसोबत संवाद साधत त्यांची विचारपूस केली व सर्वांचा निरोप घेतला. उपस्थित वारकऱ्यांनी प्रसाद गायकवाड व कुटुंबीयांचे आभार मानून त्यांचा सत्कार केला व आशीर्वाद दिले.

सुनील नारकर कोकण रेल्वेचे नवे जनसंपर्क अधिकारी

नवी मुंबई : बातमीदार

सुनील नारकर यांनी कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य जनसंपर्क अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला आहे.

सुनील नारकर यांनी १९९७ मध्ये कोकण रेल्वेमध्ये वाणिज्य विभागात प्रवेश केला आणि त्यानंतर त्यांनी त्यांच्या प्रतिष्ठित कारकिर्दीत अनेक महत्त्वाची पदे भूषवली आहेत. त्यांनी रत्नागिरी येथे प्रादेशिक वाहतूक व्यवस्थापक (आरटीएम) आणि मडगाव येथे वरिष्ठ प्रादेशिक वाहतूक व्यवस्थापक (सीनियर आरटीएम) आणि बेलापूर येथील कॉर्पोरेट कार्यालयात उपमुख्य वाणिज्य व्यवस्थापक (उपाध्यक्ष सीसीएम) म्हणून काम केले आहे.

लोहोप आरोग्य केंद्रात महिलांसाठी शिबिर

मोहोपाडा: प्रतिनिधी

रसायनी पाताळगंगा परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथे वंध्यत्वाची समस्या असणारी जोडपी आणि PCOS,PCOD ची लक्षणे असणाऱ्या महिला यांच्यासाठी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरासाठी खारघर येथील टेस्ट ट्यूब बेबी सेंटरच्या स्त्री रोग तज्ञ डॉ. नेहा राठी उपस्थित होत्या.या शिबिरात मोफत व्यंधत्व निदान,समुपदेशन आणि पुढील उपचारासाठी तज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन दिले.यावेळी मोहोपाडा रसायनी परिसरातील ३२ गावांतील ग्रामस्थांनी या शिबिराचा लाभ घेतला.यात ४६ रुग्णांना तज्ञ डॉक्टरांनी सल्ला दिला. यासाठी डॉ नेहा राठी ,वैद्यकीय अधिकारी डॉ.मंगेश देशमुख ,डॉ.सीमा पाईकराव ,निवास कांबळे,सुप्रिया गायकर ,सुपरवायझर वासंती शिंदे, स्वाती बडेकर,आशावर्कर आणि कर्मचारी उपस्थित होते.

आदर्श पतसंस्थेच्या खोपोली शाखेचे स्वमालकीच्या जागेत स्थलांतर

अलिबाग : प्रतिनिधी

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या खोपोली शाखेचे महामार्गावरील युनिमाउंट एंपायर , इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर स्वमालकीच्या जागेत रविवारी दिनांक २९ जून रोजी स्थलांतर करण्यात आले. आदर्शची ही १८वी शाखा आहे.

खालापूर तालुक्याचे सहकारी संस्था सहाय्यक निबंधक नीलेश शिंदे साहेब यांच्या शुभ हस्ते फीत कापून या नवीन जागेतील शाखेचे स्थलांतर करण्यात आले. खोपोली नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर हे यावेळी उपस्थित होते . नीलेश शिंदे यांनी आपल्या भाषणात आदर्श पतसंस्थेचा कारभार नावाप्रमाणेच आदर्श आहे. आदर्श ची सध्याची आर्थिक स्थिति ही भक्कम आहे. त्यामुळेच ग्राहकांचा या पतसंस्थेवर विश्वास आहे.

दत्ताजीराव मसुरकर आपल्या भाषणात म्हणाले की, सुरेश पाटील संस्थापक यांनी आदर्श पतसंस्थेची स्थापना करून ती राजकारण विरहित चालविली म्हणूनच ती मोठी झाली.

यावेळी संस्थेचे संस्थापक सुरेश पाटील,अध्यक्ष अभिजीत पाटील, उपाध्यक्ष कैलास जगे, संचालक अनंत म्हात्रे, सतीश प्रधान, विलाप सरतांडेल, भगवान वेटकोळी, रामभाऊ गोरीवले,संजय राऊत, सनदी लेखापाल डॉ. मकरंद आठवले, सीईओ मीनाक्षी पाटील उपस्थित होते.

निवडक

डिव्हायडरला धडकून दुचाकीस्वार ठार

पनवेल : पळस्पे ते करंजाडे असे मोटरसायकलवरून येत असताना रस्त्यावरील डिव्हायडर न दिसल्याने एक अपघातात एक ठार तर एक जखमी झाल्याची घटना घडली आहे. ऋषिकेश गावडे (वय ३०) हा त्याच्यासोबत असलेला अल्पेश कोलहकर (वय २७) याच्या बरोबर पळस्पे ते करंजाडे असे मोटरसायकलवरून येत असताना अचानकपणे पाऊस आल्याने मोटरसायकलस्वारास रस्त्यावरील डिव्हायडर न दिसल्याने त्याच्यावर मोटरसायकल आढळली. या अपघातात ऋषिकेश गावडे याचा मृत्यू झाला. तर अल्पेश कोलहकर हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पानमसाला, गुटखा हस्तगत

पनवेल : शहरातील कोळीवाडा येथील दोन वेगवेगळ्या पानटपऱ्यांवर पनवेल शहर पोलिसांनी टाकलेल्या धाडीत मोठ्या प्रमाणात हजारो रुपये किंमतीचा सुगंधी पानसाला व गुटख्याचा साठा पोलिसांनी हस्तगत केला आहे. महाराष्ट्रात गुटखा विक्रीस बंदी असताना सुद्धा अनेक जण याची छुप्या मार्गाने विक्री करीत असल्याची माहिती वपोनि नितीन ठाकरे यांना मिळताच पोलिसांच्या पथकाने या ठिकाणी छापा टाकून या दोन वेगवेगळ्या पानटपऱ्यांवरून हजारो रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकारणी दोघा जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पनवेल मनपातर्फे लोकशाही दिन

पनवेल : महानगरपालिकेमार्फत मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली प्रत्येक महिन्याचा पहिला सोमवार किंवा या दिवशी सुट्टी असल्यास, त्यानंतर येणारा कामकाजाच्या दिवशी लोकशाही दिन आयोजित करण्यात येत आहे. त्यानूसार पुढील महिन्यातील ७ जुलै रोजी महापालिका मुख्यालयात लोकशाही दिन साजरा करण्यात येणार आहे. लोकशाही दिनामध्ये सहभाग घेण्यासाठी नागरिकांनी अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. तसेच तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

वसंतराव नाईक यांना अभिवादन

पनवेल : हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने मंगळवारी (दि.१) महापालिका मुख्यालयात आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आपटा येथे तळ्यांची दुर्दशा

रसायनी : प्रतिनिधी

आपटा गावामध्ये दोन मोठी गाव तळी आहेत. या तळ्यांचा साफसफाई स्वच्छता व त्यातील पान वनस्पती काढली गेली नाही व तळी स्वच्छ केली नाहीत. त्यामुळे या तळ्यांची स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

दरम्यान, ही तळी साफसफाई न केल्यामुळे हे ग्रामपंचायतीचे नुकसान होत आहे. या बाबत पत्रकार बी.एस.कुलकर्णी यांनी वारंवार त्यांना आठवण करून दिली आहे. मोठ्या तळ्याची साफसफाई ही एप्रिलमध्ये पूर्ण झाली पाहिजे, पण हे काम केले नाही आणि आता मोठे तळे हे खोदून ठेवलेला आहे. साफसफाईचे व पाण वनस्पती काढणेचे काम अद्याप झालेले नाही. यासोबतच तो बंधाराही बंदिस्त न केल्यामुळे ते सर्व पाणी वाहून जात आहे.

गंगेच्या वाडीच्या जवळील जे तळे आहे त्यामध्ये प्रचंड कचरा बाटल्या आणि झाडी आहेत, यामुळे मासे टिकत नाहीत. ही दोन्ही तळी जर नीट स्वच्छ केली आणि यांचा लिलाव केला तर याच्यामध्ये ग्रामपंचायतीला खूप मोठ्या उत्पन्न मिळू शकते, पण हे काम न केल्यामुळे आता हे सर्व आर्थिक नुकसान होत आहे. याबाबत कुलकर्णी यांनी ग्रामसभेमध्ये विषय घेतला होता, सरपंचांनी यामध्ये लक्ष देण्याची मागणी केली होती.

स्वच्छता करण्याची नागरिकांची मागणी

पनवेल बाजारपेठेत दोन दुकानांना मध्यरात्री आग

पनवेल : वार्ताहर

पनवेलमधील भर बाजारात मंगळवारी मध्यरात्री दोन दुकानांना आग लागल्याची घटना घडली आहे. एका जागरूक नागरिकाच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली.

पनवेल शहरातील मुख्य बाजारपेठेत मोतीराम स्नॅक्स जवळ असलेल्या सलून आणि फुलाच्या दुकानातून अचानक काही जळत असल्याचा वास येवू लागला. तेव्हा सोनू राजभर या जागरूक नागरिकाने गोंगाट घालून अग्निशमन दलास पाचारण केले. अग्निशमन दलदेखील तातडीने घटनास्थळी पोहचले, पण तोपर्यंत दोन दुकाने आगीच्या भक्षस्थानी गेली होती. अग्निशमन दलाने अथक प्रयत्नाने आग आटोक्यात आणली.

ही आग आटोक्यात आणण्यासाठी दोन अग्निशमन बंब लागले. यावेळी तेथील आजूबाजूचे दुकानदार, सुरक्षा मंडळाचे कर्मचारी, विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी आदी उपस्थित होते.

जिनगोंडा बोरगावे यांना सेवानिरोप

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती

पनवेल : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेची आणि महात्मा फुले महाविद्यालयाची बोरगावे सरांनी एका सैनिकाप्रमाणे सेवा केली, असे गौरोद्गार पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महात्मा फुले महाविद्यालयाचे प्रा. जिनगोंडा वसंत बोरगावे यांच्या सेवापुर्ती सोहळ्यावेळी काढले.

संस्थेच्या समन्वय समितीचे सदस्य तसेच महाविद्यालयाच्या एचएसव्हीसी विभागाचे प्रमुख प्रा. जिनगोंडा बोरगांवे यांचा सेवापुर्ती सत्कार सोमवारी झाला. या वेळी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह उपस्थितांनी बोरगांवे सरांना शुभेच्छा दिल्या.

३१ वर्षांच्या दीर्घकाळच्या सेवेबद्दल आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल बोरगांवे यांचा गौरव करण्यात आला. या वेळी लोकनेते 'दिबां'चे सुपूत्र अतुल पाटील, प्रशांत पाटील, नवी मुंबई पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील, शिल्पा कंपनीच्या उलका धुरी, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, सरपंच दिमगोंडा बोरगांवे, डॉ. अशोक आढाव, डॉ. एन आर मढवी, डॉ. आर. ए. पाटील, डॉ. यशवंत उलवेकर, डॉ. किर्ती म्हात्रे, सुनील देशपांडे, डॉ.नितीन ससाणे, डॉ. व्ही. एस.विसे, मुक्ता भाटकर, प्रवीण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, शरयु नाईक, अनिल बोरगावे, नरेश मढंवी आदी उपस्थित होते.

आदिवासीवाड्यांवर शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप

उरण : बातमीदार, प्रतिनिधी

वनवासी कल्याण आश्रम उरणच्या वतीने अक्कादेवी आदिवासी वाडी चिरनेर, केल्याचा माळ वाडी, विंधणे वाडी येथील शाळेत जाणाऱ्या मुलांना वह्या, शालोपयोगी वस्तू वाटप, खाऊवाटप तसेच विंधणे येथे फॉन सर्पमित्र निसर्ग संवर्धन संस्था, चिरनेर, उरण यांस प्राण्यांसाठी फर्स्ट ऐड किट वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

संस्थेचे सहसचिव कुणाल शिसोदिया यांनी प्रस्तावना करून संस्थेची माहिती उपस्थिताना सांगितली. अक्कादेवी वाडी येथे २०, केळ्याचा माळ वाडीवर ३०, विंधणेवाडीवर ५५ मुलां-मुलींना वह्या तसेच शालोपयोगी वस्तू, खाऊ वाटप करण्यात आला. वनवासी कल्याण आश्रम उरणचे अध्यक्ष मनोज ठाकूर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणात कोणतीही अडचण आल्यास तेथील कल्याण आश्रमाच्या कार्यकर्त्यांस सांगावे, त्यांच्या शिक्षणासाठी लागेल ती मदत वनवासी कल्याण आश्रम आपणास करेल, अशी ग्वाही दिली.

वनवासी कल्याण आश्रमच्या वतीने फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) निसर्ग सर्प संवर्धन संस्थेचे अध्यक्ष जयवंत ठाकूर यांच्याकडे पक्षी व प्राणी यांच्यावर उपचार करण्यासाठी प्रथम उपचार किट देण्यात आले. फॉन संस्थेचे निकेतन रमेश ठाकूर यांनी चिरनेर परिसरात येणाऱ्या जंगलामध्ये येणाऱ्या प्राणी, पक्षी,कीटक संशोधकांस तेथील स्थानिक नागरिकांनी मार्गदर्शक म्हणून काम केले तर रोजगार उपलब्ध होऊ शकतो, असे सांगून ते कसे मिळवायचे त्याबद्दल माहिती दिली.

या कार्यक्रमास पाड्यांवरील जनजाती बांधवांसाठी काम करत असलेल्या जाणीव सामाजिक संस्था उलवाचे अध्यक्ष सुनील ठाकूर आवर्जून उपस्थित होते. वनवासी कल्याण आश्रमचे कुलाबा जिल्हा उपाध्यक्ष उदयजी टिळक, प्रांत महिला सहप्रमुख सुनंदा कातकरी, जिल्हा शिक्षण आयाम सहप्रमुख मीरा पाटील, बालसंस्कार वर्ग, दीपक गोरे, वामन म्हात्रे, वर्षा अधिकारी, साधना पागी, बेबीताई कातकरी, मित मेडिकल विंधणेचे मालक बळीराम पेणकर उपस्थित होते. या कार्यकमासाठी बिना इन्व्हेस्टमेंट उरण चे विपुल सरवैय्या, कमलेश प्रजापती तसेच जितेंद्र परमार, प्रशांत ठाकूर यांचे विशेष सहकार्य लाभले.

रोटरी कर्णबधीर मुलांच्या शाळेत पालक सभा

पनवेल : वार्ताहर

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्रीमती राधाबाई खेमचंद परमार रोटरी कर्णबधिर मुलांच्या विशेष निवासी शाळेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रथम एकत्रित पालक सभेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

सदर पालक सभेस ट्रस्ट चेअरमन अरविंद सावळेकर, ट्रस्ट सचिव प्रमोद वालेकर, क्लब अध्यक्ष चारुदत्त भगत, ट्रस्ट माजी सचिव राजेंद्र ठाकरे आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली. शाळेच्या प्र मुख्याध्यापिका शैला बंदसोडे यांनी सर्व पालकांना विद्यार्थ्यांसाठी आवश्यक त्या सूचना मांडल्या. ट्रस्ट चेअरमन श्री. सावळेकर यांनी उपस्थित पालकांशी सुसंवाद साधून मार्गदर्शन केले.

निवास विभागात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन सर्व सोयी सुविधांचा लाभ घ्यावा, असे पालकांना आवाहन केले. पालक सभेचे निवेदन शाळेतील वि शिक्षिका रेश्मा घाग यांनी केले. अशा प्रकारे २०२५-२६ या शैक्षणिक सत्रांतील पहिली पालकसभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली.

पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी विद्यालयातील इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी संस्थेचे सचिव एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, ज्युनिअर कॉलेजचे प्रभारी प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे उपस्थित होते.

सफाई अपनाओ, बिमारी भगाओ उपक्रम

पनवेल मनपा १ ते ३१ जुलैदरम्यान करणार जनजागृती

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत सफाई अपनाओ - बिमारी भगाओ ही जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे, संसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध आणि सार्वजनिक आरोग्य सुरक्षित राखणे या मोहिमेचा उद्देश आहे.

या मोहिमेंतर्गत उपायुक्त वैभव विधाते यांच्या नेतृत्वाखाली सबंधित प्रभागातील मुख्य आरोग्य निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक आणि सहाय्यक स्वच्छता समन्वयाने स्वच्छ हात उपक्रम, स्वच्छ घर उपक्रम, स्वच्छ परिसर उपक्रम, स्वच्छ शौचालये, स्वच्छ गटारे, नाले आणि तलाव, स्वच्छ सार्वजनिक जागा उपक्रम असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, स्वच्छतेच्या सवयी अंगीकाराव्यात आणि आजारांपासून बचाव करावा, असे आवाहन उपायुक्त वैभव विधाते यांनी केले आहे.

भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार आणि २०२५ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सफाई अपनाओ, बिमारी भगाओ हे विशेष स्वच्छता जनजागृती अभियान १ जुलै ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत राबवण्यात येणार आहे. प्रत्येक विभागात नागरिकांच्या सहभागासह विशेष स्वच्छता मोहिमा, जनजागृती रॅली, प्रबोधनपर फलक लावणे, माहितीपर पोस्टर्स वाटप करणे असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेंतर्गत पनवेल महापालिकेच्या ए खारघर, बी कळंबोली, सी कामोठे आणि डी पनवेल अशा चारही प्रभाग कार्यालयांच्या माध्यमातून प्रभागातील शाळांमध्ये 'स्वच्छ हात उपक्रम' अंतर्गत स्वच्छता आणि जेवणापूर्वी हात धुण्याच्या पद्धतींना प्रोत्साहन देणेबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. 'स्वच्छ घर उपक्रम' अंतर्गत प्रभागातील मोठ्या सोसायट्यांमध्ये घरोघरी जाऊन कचरा वर्गीकरण, कचरा महापालिकेच्या घंटागाडीमध्ये देणे आणि स्वच्छता जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. 'स्वच्छ परिसरउपक्रम' या उपक्रमांतर्गत प्रभागातील मोकळ्या जागा, प्रमुख रस्ते, प्रमुख चौक,मोकळी मैदाने, उद्याने, पालिकेच्या मोकळ्या जागा या ठिकाणी स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात येणार आहे. 'स्वच्छ शौचालय' उपक्रमांर्गत प्रभागातील स्वच्छ भारत अभियान अंतर्गत असलेले सार्वजनिक शौचालये आणि सामुदायिक शौचालये परिसर स्वच्छता, शौचलयात पाण्याची आणि हात धुण्यासाठी हँडवॉश, साबण व्यवस्था करण्यात येणार आहे.

'स्वच्छ गटारे, नाले आणि तलाव' उपक्रमांतर्गत प्रभागातील बंदिस्त गटारे, नाले आणि तलावांची सफाई मोहीम नागरीक, स्वयंसेवी संस्था आणि सफाई कर्मचारी यांच्या सहभागातून आयोजित करण्यात येणार आहे. 'स्वच्छ सार्वजनिक जागा' या उपक्रमांतर्गत कचऱ्याचे हॉट स्पॉट विशेषतः बाजारपेठा, फळे आणि भाजीपाला मंडई, फूड स्ट्रीट, नाल्यां जवळील कचरा व डेब्रीज, नाले आणि तलाव यामधील कचरा सफाई मोहीम राबविण्यात येणार आहे.

पनवेल : शिरवली ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच लक्ष्मण पाटील व बेलवली ग्रुप ग्रामपंचायतीचे उपसरपंच हेमंत तांडेल यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, अशोक साळुंखे, सागर भोईर, अंकुश पाटील, दिनेश पटेल, जितेंद्र बताले, मयुर कदम, शंकर दागर, सतीश पाटील आदी उपस्थित होते.

संपादकीय

पर्यटक संकटात

गेल्या तीन दिवसांत उत्तराखंड आणि हिमाचलमध्ये मुसळधार पाऊस, ढगफुटी, पूर आणि भूस्खलनाच्या घटनांमुळे गंभीर परिस्थिती ओढवली आहे. उत्तराखंडमधील यमुनोत्री धाममध्ये महाराष्ट्रातील सुमारे २०० पर्यटक तीन दिवसांपासून अडकल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्रातील सरकारकडून त्यांना आवश्यक ती मदत पुरवण्याकडे लक्ष दिले जातेच आहे. पण दरवर्षी उद्भवणारी तेथील परिस्थिती व या प्रदेशाची संवेदनशीलता ध्यानात घेऊनच तेथे पर्यटनविकास व शहरीकरणाचे नियोजन यापुढे करावे लागणार आहे.

उत्तराखंडला देवभूमी म्हटले जाते. गंगा व यमुना नद्यांच्या उगमस्थानांमुळे तसेच केदारनाथ, बद्रीनाथसारख्या तीर्थक्षेत्रांमुळे देशभरातून येथे वर्षभर पर्यटक येतच असतात. या डोंगराळ राज्याकरिता नैसर्गिक संकटे नवीन नाहीत. परंतु गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे या संकटांची तीव्रता व वारंवारता वाढली आहे. तसेच वाढत्या शहरीकरणामुळे नैसर्गिक संकटांतून होणारे नुकसानही वाढले आहे. उत्तराखंड आणि हिमाचलमध्ये सध्या मुसळधार पाऊस, ढगफुटी, पूर आणि भूस्खलनाच्या घटनांमुळे गंभीर परिस्थिती ओढवली आहे. काही महामार्गांसह अनेक रस्ते बंद झाल्यामुळे या राज्यांत जनजीवन तर विस्कळीत झालेच आहे. परंतु देशभरातील सुमारे ६००च्या आसपास भाविक ठिकठिकाणी अडकले आहेत. उत्तराखंडमधील यमुनोत्री धाममध्ये महाराष्ट्रातील सुमारे २०० पर्यटक तीन दिवसांपासून अडकल्याची माहिती असून यातील किमान ५० जण मुंबईतील आहेत. या अडकलेल्या मराठी पर्यटकांना आवश्यक ती मदत मिळावी याकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या लक्ष देत आहेत. रस्ते वाहून गेल्यामुळे अडकून पडलेल्या या पर्यटकांनी महाराष्ट्र सरकारकडे मदतीची मागणी केली. त्यांना खाद्यपदार्थ व अन्य मदत मिळावी याकडे सरकारी पातळीवरून लक्ष दिले जात आहे. रस्ते पूर्ववत झाल्यावरच हे पर्यटक राज्यात परतू शकतील. पुढील तीन दिवस येथे अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. रस्ते बंद झाल्यामुळे यात्राही तात्पुरती स्थगित केली गेली आहे. नद्यांमधील पाण्याची पातळी वाढल्यामुळे पूर आणि भूस्खलनाचा धोका वाढला आहे. हिमाचलमधील मंडी येथे सोमवारी चार ठिकाणी ढगफुटी झाली. यात पुलासह वाहने तसेच काही घरेही वाहून गेली. काही इमारतींचेही फक्त ढिगारे उरले. लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आल्यामुळे अनेकांचा जीव तेवढा वाचला आहे. उत्तराखंडमध्ये पौडी-कोटद्वार राष्ट्रीय महामार्गावरील गुमखल येथे संपूर्ण डोंगरच रस्त्यावर कोसळला. भूस्खलनामुळे हा महामार्ग गेल्या २४ तासांपासून बंद आहे. उत्तरकाशी जिल्ह्यातील सिलाई बंद आणि ओजरीजवळही भूस्खलन झाले आहे. येथेही पुराच्या पाण्यात काही भाग वाहून गेल्यामुळे यमुनोत्री महामार्ग बंद करण्यात आला आहे. इतरही काही ठिकाणी भुस्खलनामुळे डोंगरावरील ढिगारे कोसळून खाली रस्त्यावर आले आहेत. त्यामुळे ठिकठिकाणी वाहतूक कोंडी, लोक अडकून पडणे असे चित्र आहे. पोलिस, अग्निशमन दल, एसडीआरएफ, एनडीआरएफ आणि प्रशासकीय पथके मदत आणि बचाव कार्य करत आहेत. पर्यटन व्यवसायाचा येथील अर्थव्यवस्थेला मोठा आधार आहे. पण पर्यटनाच्या नावाखाली येथे जो अनिर्बंध विकास व शहरीकरण सुरू आहे ते मात्र येथील निसर्गाच्याच मुळावर येते आहे. आता दरवर्षी येथे नैसर्गिक आपत्तींतून होणाऱ्या नुकसानीची तीव्रता वाढत चाललेली दिसते आहे. तापमानवाढीमुळे हिमालयातील हिमनद्या वितळण्याचे प्रमाण वाढले आहे. हे सारे बदल व येथील प्रदेशाची संवेदनशीलता ध्यानात घेऊनच येथील पर्यटनविकास, शहरीकरणाचे नियोजन करावे लागणार आहे. अन्यथा प्रतिवर्षी पावसाळ्यात स्थानिकांसोबतच पर्यटकांनाही त्याचा फटका बसतच राहील.

कौशल्ये बजावतात महत्त्वाची भूमिका

आजच्या स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी केवळ पदवी पुरेशी नसते, तर त्यासोबत विविध कौशल्यांची जोड आवश्यक असते. कोणत्याही क्षेत्रात स्वतःचे वेगळेपण सिद्ध करण्यासाठी कौशल्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. कौशल्ये म्हणजे अशी क्षमता, जी आपल्याला आपले काम सहज, योग्य आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यास सक्षम करते. प्रत्येक व्यक्तीकडे काही ना काही कौशल्ये असतात, ज्यामुळे त्याची स्वतःची ओळख निर्माण होते. परंतु, कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी काही विशिष्ट कौशल्ये अत्यंत आवश्यक ठरतात. या लेखात अशाच काही महत्त्वाच्या कौशल्यांचा सविस्तर आढावा मी घेतला आहे.

'संवाद कौशल्य' हे यशस्वी कामगिरीचा पाया आहे. प्रभावी संवादामुळे सहकारी, वरिष्ठ, ग्राहक किंवा मित्रमैत्रिणींशी सकारात्मक संबंध निर्माण होतात आणि कामातील अडचणी दूर होतात. चांगला संवाद साधण्यासाठी दुसऱ्याचे म्हणणे बारकाईने ऐकणे, आपले विचार स्पष्ट आणि संक्षिप्तपणे मांडणे, आत्मविश्वासाने बोलणे, सकारात्मक शब्दांचा वापर करणे आणि समोरच्या व्यक्तीच्या दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे. मित्र, कुटुंब आणि सहकाऱ्यांशी नियमित संभाषणाचा सराव केल्यास संवाद कौशल्य सुधारते, ज्याचा कामावर सकारात्मक परिणाम होतो.

'वेळेचे व्यवस्थापन' – कोणतेही काम, मग ते छोटे असो वा मोठे, वेळेचे योग्य नियोजन आणि पालन करणे आवश्यक आहे. वेळेची कदर करणारी व्यक्ती नेहमीच विश्वासार्ह ठरते. कामाचे प्राधान्य ठरवून नियोजन करणे, ठरलेल्या वेळेच्या किमान एक तास आधी तयारी करणे आणि अनावश्यक गोष्टींमुळे वेळ वाया घालवणे टाळणे या बाबी वेळेचे व्यवस्थापन सुधारण्यास मदत करतात. यामुळे कामाची कार्यक्षमता वाढते आणि विश्वासार्हता निर्माण होते.

'समस्या सोडवण्याची क्षमता' हे आणखी एक महत्त्वाचे कौशल्य आहे. कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी स्वतःहून सोडवण्याचा प्रयत्न करणे आणि नवीन उपाययोजना सुचवणे यामुळे आपली सर्जनशीलता आणि कार्यक्षमता दिसून येते. समस्येचे मूळ शोधून त्यावर उपाय शोधणे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आणि सहकाऱ्यांशी चर्चा करून उपाय शोधणे या गोष्टी या कौशल्याचा भाग आहेत. यामुळे कामाच्या ठिकाणी आपले योगदान अधिक प्रभावी ठरते.

'तांत्रिक कौशल्ये' आजच्या डिजिटल युगात अनिवार्य ठरली आहेत. आपण ज्या क्षेत्रात काम करतो, त्या क्षेत्रातील मूलभूत तांत्रिक ज्ञान असणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, संगणकाचे मूलभूत ज्ञान, सॉफ्टवेअर हाताळणी, डेटा विश्लेषण आणि इंटरनेटचा वापर यांचा समावेश होतो. तसेच, क्षेत्र-विशिष्ट तंत्रज्ञान किंवा साधनांचे ज्ञान, जसे की प्रोग्रामिंग, डिझायनिंग किंवा डेटा मॅनेजमेंट, यामुळे आपण कामात प्रगती करू शकतो आणि नवीन संधी मिळवू शकतो.

'प्रभावी लेखन आणि वाचन' ही कौशल्ये कामाच्या ठिकाणी तितकीच महत्त्वाची आहेत. स्पष्ट आणि व्यावसायिक लेखनामुळे आपले विचार व्यवस्थित मांडता येतात, तर चांगले वाचन नवीन माहिती आत्मसात करण्यास मदत करते. अचूक आणि व्याकरणदृष्ट्या बरोबर लेखन करणे आणि कामाशी संबंधित दस्तऐवज किंवा माहिती नीट समजून घेणे यामुळे कामाची गुणवत्ता वाढते.

'संघकामगिरी (टीमवर्क)' हे यशस्वी कामगिरीचे महत्त्वाचे सूत्र आहे. समंजसपणे आणि सहकार्याच्या भावनेने काम केल्यास मोठी कामे सहज पूर्ण होतात. सहकाऱ्यांना मदत करणे, त्यांच्या मतांचा आदर करणे आणि संघाचे ध्येय साध्य करण्यासाठी योगदान देणे या बाबी संघकामगिरीला बळकटी देतात. यामुळे कामाचे वातावरण सकारात्मक राहते आणि उत्पादकता वाढते.

'नैतिक मूल्ये आणि प्रामाणिकपणा' राखणे कामाच्या ठिकाणी अत्यंत गरजेचे आहे. नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, जबाबदारी स्वीकारणे, चुका मान्य करणे आणि पारदर्शक व प्रामाणिक वर्तन ठेवणे यामुळे आपली विश्वासार्हता वाढते आणि दीर्घकालीन यश मिळते. प्रामाणिक व्यक्ती नेहमीच विश्वासार्ह ठरते आणि त्याला कामाच्या ठिकाणी आदर मिळतो.

'आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता' हे कौशल्य यशस्वी करिअरसाठी आवश्यक आहे. स्वतःवर विश्वास ठेवून निर्णय घेण्याची क्षमता असावी आणि चुका झाल्यास त्यातून शिकण्याची वृत्ती ठेवावी. आत्मविश्वासामुळे आव्हानांना सामोरे जाण्याची हिंमत मिळते, स्वतःच्या क्षमतांवर विश्वास वाढतो आणि स्वतंत्रपणे काम करण्याची क्षमता विकसित होते.

'सतत शिकण्याची वृत्ती' ही आजच्या बदलत्या काळात अत्यंत महत्त्वाची आहे. तंत्रज्ञान आणि कामाच्या पद्धती सतत बदलत असतात, त्यामुळे जिज्ञासू वृत्ती ठेवून नवीन गोष्टी शिकणे आवश्यक आहे. नवीन कौशल्ये शिकण्यासाठी प्रशिक्षण घेणे, उद्योगातील नवीन घडामोडींशी अद्ययावत राहणे आणि संशोधन वृत्ती ठेवून नवीन माहिती मिळवणे यामुळे कामात प्रगती होते.

'सृजनशीलता आणि अनुकूलता' ही कौशल्ये कामात नाविन्य आणण्यासाठी महत्त्वाची आहेत. नवीन आणि नाविन्यपूर्ण कल्पना मांडणे, बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे आणि कामात सर्जनशीलता आणणे यामुळे आपण इतरांपेक्षा वेगळे ठरतो. सृजनशील व्यक्ती नेहमीच नवीन संधी निर्माण करू शकते.

'भावनिक बुद्धिमत्ता' म्हणजे स्वतःच्या आणि इतरांच्या भावना समजून घेण्याची आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता. यामुळे सहकाऱ्यांशी सकारात्मक संबंध निर्माण होतात, तणावपूर्ण परिस्थितीत शांत राहता येते आणि संघर्षांचे निराकरण प्रभावीपणे करता येते. भावनिक बुद्धिमत्ता कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरण निर्माण करते.

'नेटवर्किंग कौशल्य' हे व्यावसायिक संबंध निर्माण करण्यासाठी आणि नवीन संधी मिळवण्यासाठी उपयुक्त ठरते. उद्योगातील लोकांशी संपर्क साधणे, व्यावसायिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे आणि सामाजिक व्यासपीठांचा योग्य वापर करणे यामुळे करिअरच्या नवीन संधी उपलब्ध होतात.

कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी संवाद कौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, तांत्रिक ज्ञान, संघकामगिरी, नैतिक मूल्ये, आत्मविश्वास, सृजनशीलता, भावनिक बुद्धिमत्ता, सतत शिकण्याची वृत्ती आणि नेटवर्किंग कौशल्ये अत्यंत आवश्यक आहेत. ही कौशल्ये आत्मसात केल्यास आपण आपल्या करिअरमध्ये यशस्वी होऊ शकतो आणि समाजात चांगले स्थान मिळवू शकतो. प्रत्येकाकडे काही ना काही कौशल्य असते, परंतु ते वेळीच ओळखून त्यावर मेहनत घेणे गरजेचे आहे. सध्याच्या बाजारपेठेत कौशल्य असलेल्या व्यक्तींना मोठ्या संधी उपलब्ध होतात. म्हणूनच, या कौशल्यांचा विकास करून आपण आपल्या करिअरला नवी उंची देऊ शकतो.

-समीक्षा चव्हाण
मु.पो. तारळे ता. पाटण जि. सातारा

बदलते तंत्रज्ञान

प्रेशर कुकर वापरताना 'या' गोष्टींची काळजी घ्या

कुकर शिट्टी वाजवत नाही यामागे अनेक कारणे असू शकतात. एक सामान्य कारण म्हणजे प्रेशर रिलीज व्हॉल्व्ह किंवा कुकरवर शिट्टी लावणारा भाग ब्लॉक झालेला असतो. जेव्हा वाफेचा रस्ता ब्लॉक केला जातो, तेव्हा आतील दाब वाढत राहतो परंतु बाहेर पडू शकत नाही, ज्यामुळे कुकर फुटू शकतो. अशा परिस्थितीत, गॅस ताबडतोब बंद करणे आणि कुकर थंड होऊ देणे सर्वात महत्वाचे आहे. कुकर थंड करण्यासाठी, तो काढून बाजूला ठेवा आणि कोणत्याही परिस्थितीत जबरदस्तीने शिट्टी काढण्याचा प्रयत्न करू नका.

जर कुकरमध्ये जास्त पाणी किंवा अन्न भरले तर, दाब योग्यरित्या तयार न झाल्यामुळे शिट्टी वाजत नाही. म्हणून, कुकरची कमाल मर्यादा नेहमी लक्षात ठेवा आणि ती जास्त भरू नका. कुकरमध्ये योग्य प्रमाणात पाणी आणि पुरेशी जागा असावी जेणेकरून वाफ तयार होईल आणि ती शिट्टीद्वारे बाहेर पडेल.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे रबर गॅस्केट किंवा सील खराब होणे. जर ते सैल किंवा फाटलेले असेल तर कुकर व्यवस्थित बंद होत नाही आणि प्रेशर लीक होतो. यामुळे शिट्टी वाजत नाही आणि अन्न व्यवस्थित शिजत नाही. म्हणून, कुकरचे रबर सील, शिट्टी आणि सेफ्टी व्हॉल्व्ह वेळोवेळी तपासले पाहिजेत. वापरल्यानंतर, ते पूर्णपणे स्वच्छ करा आणि कोरडे ठेवा जेणेकरून घाण किंवा गंज टाळता येईल.

जर तुम्हाला वाटत असेल की कुकर खूप गरम झाला आहे पण शिट्टी अजूनही वाजत नाही, तर तो ताबडतोब गॅसवरून काढा. पण तो थंड करण्यासाठी पाण्याखाली ठेवण्याचा प्रयत्न करू नका. यामुळे कुकरमधील दाब अचानक कमी होऊ शकतो आणि झाकण फुटू शकते. योग्य मार्ग म्हणजे तो नैसर्गिकरित्या थंड होऊ देणे आणि नंतर झाकण उघडणे. लक्षात ठेवा, प्रेशर कुकर जितका उपयुक्त आहे तितकीच त्याची वापरताना काळजी न घेतल्यास तो धोकादायक देखील ठरू शकतो. म्हणून जर कुकरची शिट्टी वाजत नसेल, तर घाबरू नका पण निष्काळजीही राहू नका. योग्य पद्धत अवलंबा आणि वेळोवेळी ती तपासत राहा. यामुळे तुमचे कुटुंब आणि तुमचे किचन सुरक्षित राहण्यास मदत होईल.

स्वातंत्र्यसैनिक युसूफ मेहर अली



निमित्त

युसूफ मेहर अली यांचे मूळ नाव युसूफ झफर मर्चंट हे भारतीय स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचे कुटुंब मूळ गुजरातच्या कच्छ भागातील होते. मेहरअली यांच्या आजोबांचा मुंबईमध्ये कापडाचा व्यवसाय होता. कॉलेजमध्ये असताना ते बॉम्बे प्रेसीडेंसी युथ लिग संघटनेत सामील झाले. ते सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक सदस्यापैकी एक होते. त्यांनी १९४२च्या चले जाव आंदोलनात महत्त्वाची भूमिका राबवली होती. 'चले जाव' ही घोषणादेखील त्यांनीच दिली होती.

त्यांचे खोजा मुस्लिम कुटुंब मूळचे गुजरातच्या कच्छ संस्थानातील. त्यांचे वडील व्यापारानिमित्त मुंबई व कलकत्ता या शहरांत राहत. यूसुफ यांचा जन्म मुंबईत झाला पण त्यांचे प्राथमिक शिक्षण कलकत्यात झाले. नंतर त्यांनी सर्व शिक्षण मुंबईतच घेतले. विद्यार्थि दशेतच रस्पूट्यीन क्लब नावाची युवक संघटना मिनू मसानी, उपेंद्र देसाई, के एफ. नरिमन आदी मित्रांच्या साह्याने त्यांनी स्थापन केली. एल्फिन्स्टन महाविद्यालयातून त्यांनी पदवी घेतली (१९२५). त्यानंतर ते एलएलबी झाले पण त्यांच्या युवक चळवळीमुळे त्यांना वकिलीची सनद नाकारण्यात आली. तेव्हा त्यांनी बॉम्बे यूथलीगची स्थापना केली पुढे तिचेच रूपांतर बॉम्बे प्रसिडेन्सी यूथ लीगमध्ये झाले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वांवर यूथ लीगची श्रद्धा होती. लीगच्या निवडक चारशे स्वयंसेवकांनी मेहरअलींच्या नेतृत्वाखाली मुंबई बंदरात सायमन कमिशनविरुद्ध निदर्शने केली. त्यात मेहरअलींना मार बसला. १९२९ मध्ये त्यांनी लष्कराच्या धर्तीवर नॅशनल मिलिशा संघटना स्थापन केली. या संघटनेचे ध्येय लोकांना शिक्षित करून स्वातंत्र्याची जाणीव करून द्यावयाची आणि नंतर त्यांना कृतीसाठी उद्युक्त करावयाचे, हे होते. बार्डोलीचा साराबंदी सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह आदींतून त्यांनी सक्रिय भाग घेतला. महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीनंतर त्यांनी स्वदेशी वस्तूंचा सर्वत्र प्रसार केला आणि मुंबईत स्वदेशी वस्तू विकल्या. या सुमारास व्हॅनगार्ड या नियतकालिकाचे संपादकपद त्यांच्याकडे आले. यात त्यांनी महात्मा गांधींची परखड मुलाखत छापली. परिणामतः ते नियतकालिक बंद पडले व मेहरअलींना शिक्षा झाली. १९३८ मध्ये त्यांनी यूरोप-अमेरिका खंडांचा सदिच्छा दौरा करून तेथील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. त्यांना वैयक्तिक सत्याग्रहासाठी पुन्हा अटक झाली (१९४०). ते तुरुंगात असतानाच त्यांची मुंबई महापालिकेच्या महापौरपदी निवड झाली (१९४१). मुंबईच्या कामगारांना संघटित केले.यामुळे ब्रिटिश सरकारला गुमास्ता कायदा करणे भाग पडले. १९४२ मध्ये त्यांनी छोडो भारत आंदोलनात भाग घेतला. भूमिगत राहून त्यांना जनजागृती करावयाची होती पण ते सापडले व त्यांना शिक्षा झाली. तुरुंगातील वातावरणात त्यांची प्रकृती अधिक क्षीण झाली. पुढे उपचारार्थ ते अमेरिकेला गेले (१९४७) पण फारसा उपयोग झाला नाही. अखेर ऐन उमेदीतच ते मुंबई येथे मरण पावले. २ जुलै, १९५० रोजी वयाच्या ४७ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. पनवेल येथील तारा येथे त्यांच्या नावे युसूफ मेहेर अली सेंटर चालवले जाते.**(साभार : इंटरनेट)**

बातमीतील बात

आरोग्य प्रहर

काकडी खाण्याची योग्य वेळ कोणती?

काकडी ही एक हायड्रेटिंग थंडगार भाजी आहे, जी उन्हाळ्याच्या दिवसात खाणं विशेषतः फायदेशीर मानले जाते. आहारतज्ज्ञ दीपलक्ष्मी यांच्या मते, सकाळी किंवा मध्यरात्री काकडी खाणे खरोखरच फायदेशीर आहे, विशेषतः उष्ण हवामानात.

त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने द्रवपदार्थ पुन्हा भरण्यास मदत होते आणि त्यातील सौम्य फायबर पचनास मदत करते. चिमूटभर सैंधव मिठासह लावून खाल्ल्याने पोटफुगीचा त्रास असलेल्यांना मदत होऊ शकते आणि चव वाढू शकते, परंतु संयम महत्त्वाचा आहे. जास्त मीठ, अगदी सैंधव मीठदेखील सोडियमचे सेवन वाढवू शकते,

काकडी खाण्याची योग्य पद्धत

त्यांनी नमूद केले आहे की, रात्रीच्या जेवणात काकडी पूर्णपणे टाळण्याचे कोणतेही वैज्ञानिक कारण नाही. व्यवस्थित पचन केल्यास काकडी रात्रीच्या जेवणात सुरक्षितपणे समाविष्ट केली जाऊ शकते, असे दीपलक्ष्मी म्हणाल्या.

काकडीचा रायता पारंपरिक आणि पौष्टिक पदार्थ आहे जो हायड्रेशन, फायबर आणि आतड्यांना अनुकूल प्रोबायोटिक्स देतो. पचनासदेखील मदत करते. काकडीचा जास्तीत जास्त फायदा घेण्यासाठी ती पूर्णपणे धुणे, दोन्ही टोके कापणे आणि जर ती सेंद्रिय नसेल तर सोलणे चांगले, जेणेकरून कीटकनाशकांचा धोका कमी होईल. पचनसंवेदनशीलता असलेल्यांना बिया काढून टाकल्यानेदेखील फायदा होऊ शकतो.

काकडीचे आरोग्यदायी फायदे

काकडी हे अविश्वसनीयपणे बहुमुखी आहे आणि विविध प्रकारच्या पदार्थांमध्ये त्यांचा समावेश करता येतो. काकडी जेवणात पोत, चव आणि पौष्टिक मूल्य वाढवतात, काकडीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते, जे पचनक्रियेसाठी आवश्यक असते. तुमच्या आहारात काकडींचा समावेश केल्याने आतड्यांची नियमित हालचाल होते आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत होते. बहुतेक पाणी असल्याने त्यात कॅलरीज खूप कमी असतात, परंतु तृप्तता येते आणि तुम्हाला भूक लागत नाही. दुसरे म्हणजे, त्यात विरघळणारे फायबरचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि ते डिटॉक्सिफाय होतात,

जरी अधिक मानवी संशोधनाची आवश्यकता असली तरी प्राण्यांच्या चाचण्या आणि टेस्ट ट्यूब अभ्यासातून असे दिसून आले आहे की, मधुमेहींना काकडीचा फायदा रक्तातील साखरेची पातळी कमी करून आणि मधुमेहाच्या गुंतागूंत रोखून होऊ शकतो, असे गोयल म्हणाले.

खासदार धैर्यशील पाटील यांनी घेतला घरकुल योजनेचा आढावा

पेण : प्रतिनिधी

पेण पंचायत समिती अंतर्गत घरकुल योजनेबाबत आढावा बैठकीचे आयोजन उप विभागीय कार्यालय पेण येथे करण्यात आले होते. या बैठकीत राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील उपस्थित होते.

यावेळी खासदार धैर्यशील पाटील यांनी स्पष्ट निर्देश दिले की, कोणताही पात्र लाभार्थी शासनाच्या घरकुल योजनेपासून वंचित राहता कामा नये. तसेच, घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या अनुदानाशिवाय जे मनरेगाचा मरेहागाचा अतिरिक्त रु. २७ हजारचा हप्ता आहे, तो देखील शंभर टक्के मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे आदेश अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीला जिल्हा प्रकल्प अधिकारी प्रियदर्शनी मोरे मॅडम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भालेराव, पेण गटविकास अधिकारी लेंडी साहेब तसेच इतर संबंधित अधिकारी व ग्रामसेवक उपस्थित होते.

वाहनतळात झाड पडून वाहनांचे नुकसान

माथेरान : बातमीदार

माथेरान शहरात कोणत्याही वाहनांना प्रवेश नसल्याने पर्यटक आपली वाहने माथेरान दस्तुरी नाका येथील वाहनतळात उभी करतात. या वाहनतळात एक जुने झाड कोसळले असून वाहनतळात उभ्या असलेल्या तीन वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

माथेरान पर्यटनस्थळी सध्या पावसाळी पर्यटन हंगाम जोरात सुरू आहे.प्रत्येक विकेंडला पर्यटक येथे मोठ्या संख्येने येत आहेत.यामध्ये आपल्या खाजगी वाहनांनी येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांची गर्दी देखील येथील वाहनतळात दिसत आहे.माथेरान डोंगरमाथ्यावर पाऊस जोरदार असून वारा सुद्धा जोरदार वाहतो यामुळे झाडे कोसळण्याची शक्यता असते.सोमवारी सायंकाळी पावसाच्या सरींसोबत वारा देखील वाहत होता आणि त्यामुळे एक झाड वाहनतळात कोसळले यामध्ये तीन वाहनांचे नुकसान झाले आहे.तर मागील काही दिवसांपूर्वी देखील अशीच घटना वाहनतळात घडली होती त्यावेळी देखील असेच तीन वाहनांचे येथे नुकसान झाले होते.माथेरान पर्यटनस्थळावर पावसातअश्या घटना घडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे वाहनतळात नुकसान होणाऱ्या वाहनांची नुकसान भरपाई कोण देणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विशेष मोहीम सुरू

रायगड : रामप्रहर वृत्त

विज्ञान शाखेत इ. ११ वी व १२ वीत विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या तसेच अभियांत्रिकी पदविका शिक्षण घेत असलेल्या व पुढील उच्च शिक्षणाकरिता व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेळेत जात वैधता प्रमाणपत्र मिळावे याकरिता राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.०४ जुलै पर्यंत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विशेष मोहिम विशेष मोहिम सुरु असल्याची माहिती उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जयंत चाचरकर यांनी दिली आहे.

जात वैधता प्रमाणपत्राअभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यापासून वंचित राहू नये यास्तव ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला नाही, अशा विद्यार्थ्यांनी ज्या जिल्ह्यातून जात प्रमाणपत्र मिळवले आहे त्या जिल्ह्याच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्वरीत अर्ज सादर करावेत. ज्या विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.३१ मे २०२५ पूर्वी अर्ज सादर केले आहेत परंतु, अद्याप वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही अशा विद्यार्थ्यांनी समिती कार्यालयात दि.०४ जुलै २०२५ पर्यंत हजर राहून त्रुटींची पूर्तता करावी.

जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे ७ जुलैला आयोजन

रायगड : रामप्रहर वृत्त

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार माहे जुलै, २०२५ मध्ये होणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि.०७ जुलै २०२५ रोजी दुपारी १.०० वा.राजस्व सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड येथे आयोजित केला आहे,असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ. रविंद्र शेळके यांनी कळविले आहे.

अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनतर्फे वृक्षारोपण

अलिबाग : प्रतिनिधी

कृषी दिनाचे औचित्य साधून रायगड फोटोग्राफर आणि व्हिडिओग्राफर असोसिएशनच्या आवाहनानुसार जिल्हास्तरीय वृक्षारोपण कार्यक्रम एकाच दिवशी एकाच वेळी करण्याचे आयोजन केले होते. त्यानुसार अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनतर्फे मंगळवारी (दि. १) अलिबाग तालक्यातील खंडाळे ग्रामपंचायत हद्दीतील सागाव क्रिकेट मैदान परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. चिकू, पेरू, सीताफळ, काजू अशा विविध प्रकारच्या ५५ फळ झाडांच्या रोपांची लागवड करण्यात आली. या वृक्षरोपण कार्यक्रमाप्रसंगी खंडाळे ग्रामपंचायत सदस्या, रायगड फोटोग्राफर अँड व्हिडिओग्राफर्स असोसिएशन खजिनदार जितेंद्र मेहता, अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे, सचिव विकास पाटील, खजिनदार विवेक पाटील, सह कार्याध्यक्ष सुबोध घरत, सल्लागार सुरेश खडपे, सचिन आसराणी,विजय पाटील, गणेश जाधव, वैभव शिंदे, योगेश सावंत, निलेश दुदम, अमर मढवी, दिलीप राजभर, दीपेश पाटील, सात्विक पाटील, रुचिता प्रणय भगतखंडाळा ग्रामपंचायत सदस्य, प्रणय भगत, दीनानाथ पाटील, दीपक पाटील, माजी सदस्य अनिश पाटील, प्रशांत म्हात्रे, अमोल गायकवाड, रितेश ठाकूर, मयुरेश भगत, बंड्या पाटील, आझा पाटील आदी सागाव ग्रामस्थ या कार्यक्रमास उपस्थित होते. सामाजिक वनीकरण विभागाने वृक्ष रोपणासाठी रोपे उपलब्ध करून दिली.

वाहनाची धडक बसलेल्या जखमी बैलाला जीवदान

पाली : प्रतिनिधी

मुंबई-गोवा महामार्गजवळ वाकण फाट्यावर सोमवारी (दि. ३०) एका बैलाला अज्ञात वाहनाने उडविले. हा बैल जखमी होऊन रस्त्याच्या कडेला तडफडत होता. या जखमी बैलाची माहिती पत्रकार धम्मशील सावंत यांनी समाजमाध्यमांवर देऊन मदतीचे आवाहन केले. त्यानंतर या बैलावर स्थानिकांनी लागलीच उपचार करून त्याला पुढील उपचारासाठी पाठवले आहे.

रस्त्यावर जखमी अवस्थेत बैल पडल्याचे येथील पत्रकार सावंत यांनी पाहिले. त्यांनी लागलीच या बैलाचा व्हिडिओ व फोटो काढून समाज माध्यमांवर विविध गटात पाठवले आणि उपचार करण्याचे आवाहन केले. ही माहिती भाजप प्रदेश सदस्य राजेश मपारा व

सुधागड तालुका मराठा समाज अध्यक्ष धनंजय साजेकर यांनी शिवऋण प्रतिष्ठानला दिली. शिवऋण प्रतिष्ठानची टीम लगेचच पोहचली. पाली पंचायत समिती गटविकास अधिकारी लता मोहिते यांच्या माध्यमातून पशुवैद्यकीय सुधागड यांच्या सहकार्याने बैलाला प्रथमोपचार दिले. त्यानंतर लगेचच जखमी बैलाला पुढील अधिक उपचारासाठी संत तुकाराम महाराज गोशाळा, धामणे पुणे येथे पाठविण्यात आले.

या बैलाला गोशाळेत पाठवण्यासाठी ट्रान्सपोर्ट सेवा खर्च राजेश मपारा यांनी दिले. जखमी बैलाला उपचार करण्यासाठी व जीवदान देण्यासाठी शिवऋण प्रतिष्ठानचे सदस्य केतन म्हस्के, किशोर खरीवले, अमर लहाने तसेच यावेळी येथील वाहतूक पोलीस प्रवीण शिर्के व प्राणीमित्र अजित जैन यांचे सुद्धा सहकार्य लाभले. दरम्यान, नागोठणे पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस टीमदेखील मदतीला धावून आली.

दहागाव करंबेळी खरीवली शाळेच्या संरक्षण भिंतीचे लोकार्पण

खालापुर : रामप्रहर वृत्त

भारतीय जनता पक्ष खालापूर यांचे माध्यमातून जिल्हा नियोजनमधून चार लाख रुपये निधी उपलब्ध करून करंबेली खरविली प्राथमिक शाळेमध्ये संरक्षण भिंतीचे काम करण्यात आले. त्याचाही आज लोकार्पण सोहळा पार पडला.

या प्रसंगी करंबेली खरविली प्राथमिक शाळेमध्ये भरत महाडिक यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी भारतीय जनता पक्ष खालापूर मंडळ अध्यक्ष सनी यादव, खालापूर तालुका सरचिटणीस रविंद्र पाटील, कर्जत खालापूर विधानसभा युवा संयोजक प्रसाद पाटील, निकिता हेलांडे, विकास रसाळ, हरिभाऊ जाधव, रवींद्र मोरे, राजू महाडिक बूथ अध्यक्ष, राजू पाटील, प्रभाकर पाटील, विष्णू पाटील, काशिनाथ पाटील, रघुनाथ मोहिते, नारायण मोहिते, रामदास पालांडे, शेखर महाडिक, विलास महाडिक, हनुमंत महाडिक, बाळाराम महाडिक, भोलेनाथ महाडिक, प्रफुल महाडिक, गीतेश महाडिक, सतीश महाडिक, अजित गायकर, हनुमंत महाडिक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

श्री शिवशंभू प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

तळा : प्रतिनिधी

श्री शिवशंभू प्रतिष्ठान रायगडच्या माध्यमातून शाळेला चाललो आम्ही या उपक्रमाअंतर्गत तळेगाव/तळे केंद्रातील १६ शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांचे हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

सदर प्रसंगी गटविकास अधिकारी महादेव शिंदे,सरपंच प्रविण आंबार्ले, केंद्रप्रमुख आयाजी जमधाडे, संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय येलवे,प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनिल खेरटकर, सचिव महेश पवार, महेश गवारकर,दिगंबर सुतार ,मारूती शिर्के गुरुजी,अभिनव ज्ञान मंदिर-उसर खूर्द चे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे,केंद्रातील जि. प. शाळाचे मुख्याध्यापक जगदीश कासे,स्मृती शिंदे आदि मान्यवर व केंद्रातील सर्व शिक्षक,प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व सदस्य, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रथम सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते श्रीशिवशंभू प्रतिष्ठानचे माध्यमातून दप्तर,छत्री,वह्या,इत्यादी शैक्षणिक साहित्य व प्रत्येक शाळेला एकूण १६ घड्याळे देण्यात आली.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे बोर्ले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.

भुमापन नं. / हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु.पै.	जमीन मालकांची नावे
६३	०-१६-२० **पैकी ०-०८-१०**	०.५३	जनाबाई लक्ष्मण माळी कल्याणी पुंडलिक पाटील
६२/२	०-१९-४० **पैकी ०-०९-७०**	०.६४	केवल पुंडलिक पाटील मथुरा पुंडलिक पाटील
८४/१	०-०३-५० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-०४-५० **पैकी ०-०२-२५**	०.३४	मनिषा गंगाराम पाटील माईबाई काशिनाथ मुंढे शांताबाई विष्णू मुंढे दिनेश अर्जुन पाटील निधी नितिन गायकर सुषमा अर्जुन पाटील

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०१/०७/२०२५.

सही/-
ॲड. प्रशांत अशोक भुजबळ

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील महादेव तुकाराम तांडेल व इतर यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

परीशिष्ट
शेतजमिनीचे वर्णन

मौजे लोणिवली, तालुका. पनवेल, जि. रायगड.

कब्जेदारांचे नाव	गट नं./ सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू.पै.
महादेव तुकाराम तांडेल एकनाथ आत्माराम पाटील व इतर २	१३	१	१-२१-९० पो.ख. ०-३४-७० **१-५६-६०** **पैकी खरेदी क्षेत्र** **०-८६-१३** **हे.आर.चौ.मी.**	१२.६२
	१३	२	०-३८-०० पो.ख. ०-०२-०० **०-४०-००** **पैकी खरेदी क्षेत्र** **०-२२-००** **हे.आर.चौ.मी.**	५.५०

महादेव तुकाराम तांडेल व एकनाथ आत्माराम पाटील यांच्या हिश्याचे विक्री एकुण क्षेत्र १-०८-१३ हे.आर.चौ.मी.

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी / नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/०७/२०२५

सही/-
विजय भगत ॲन्ड असोशिएटस्
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)

शॉप नं. १२८, पहिला मजला, नगरपालीका शॉपीग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो.९३२२६५२३१९/९८२०६०७५७२
Email - vijaybhagat43@gmail.com

सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशील १) श्री. गोपीनाथ शनिवार सांगडे २) श्री. प्रकाश शनिवार सांगडे ३) श्री. जयेन्द्र शनिवार सांगडे ४) श्री. शशिकांत शनिवार सांगडे सर्व रा. वलप, ता. पनवेल, जि. रायगड. ह्यांच्या ताबेकबजात असलेली अशी खालील वर्णनाच्या मौजे भिंगार, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमीन मिळकत आहे.

जमिनीचे वर्णन

मौजे	नवीन सर्व्हे नं.	जुना सर्व्हे नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)
भिंगार	४७/३	१४२/३पै	०-३७-८० ०-०३-४०

सदरची जमीन मिळकत दि. १९/०१/२०१२ रोजीच्या खरेदीखताने (पवल- १०५८/२०१२) जानू पांडू पाटील ह्यांच्याकडून आमचे अशिलांनी खरेदी केलेली आहे. तेव्हापासून सदरची जमीन आमचे अशिलांचे ताबेकबजा वहिवाटीत आहे. सदरची जमीन खरेदी केल्यानंतर शंकर जानू पाटील... वगैरे यांनी सदर जमीन मिळकतीसंबंधी पनवेल येथील दिवाणी न्यायालयामध्ये रे.मु.नं. ४१३ / २०१६ हा वाटपकरीता साठेकरार, अखत्यारपत्र, खरेदीखत रद्द करुन मिळणेकरीता दावा दाखल केला. सदरचा दावा दाखल केल्यानंतर दाव्याचे समन्स आमचे अशील व शंकर पांडू पाटील बजावण्यात आले. समन्स बजावण्यात आल्यानंतर आमचे अशील मे. कोर्टात हजर झाले. त्यानंतर सन २०२० ते २०२२ पर्यंत पूर्ण भारत देशात कोरोना महामारी होती. त्यामुळे काही महिने टाळेबंदी होती, कोर्ट देखील बंद ठेवलेले होते. तसेच पक्षकारांना मे. कोर्टात येण्यापासून देखील प्रतिबंध करण्यात आलेले होते. अश्या परिस्थितीत दि. १९/०३/२०२१ रोजी शंकर पांडू पाटील यांनी मे. कोर्टात दाखल केलेला दावा संबंधित न्यायालयाने मंजूर करुन आमचे अशिलांचे दि. १९/०१/२०१२ रोजीचे नोंदणीकृत व कायदेशीर खरेदीखत रद्द ठरविण्यात आले. सदरची बाब आमचे अशिलांना समजल्यानंतर आमचे अशिलांनी पनवेल येथील अतिरीक्त जिल्हा न्यायालयामध्ये दिवाणी अपील १०३ /२०२४ हे दाखल केलेले आहे. आता शंकर पांडू पाटील ... वगैरे सदरची जमीन तिऱ्हाईत इसमांना विक्री करण्याच्या बेतात असल्याचे आमचे अशिलांना खात्रीशीर समजलेले आहे. सबब तमाम जनतेस माहितीसाठी सावधगिरीचा इशारा म्हणून सदरची सावधान नोटीस देणेत येत आहे.

ह्या सावधान नोटीसीने तमाम जनतेस असे कळविण्यात येते की, वरील मिळकतीसंबंधी १) श्री. शंकर पांडू पाटील २) श्री. नामदेव पांडू पाटील ३) **कै. जानू पांडू पाटील यांचे वारस** ... ३ / १) अनिल जानू पाटील ३/२) चित्रा कृष्णा पाटील ३/३) जयश्री कमळाकर मोकल ४) ताई आंबो नाईक ५) राजेश शंकर मते ६) प्रभाकर दत्तू ठाकूर ७) रुंदा विलास ठाकूर ह्यांच्याबरोबर कोणीही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी- विक्रीचा व्यवहार करू नये. तसे केल्यास होणाऱ्या परिणामास संबंधीतास जबाबदार धरले जाईल ह्याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे सावधान नोटीस दिली.

पनवेल
तारीख १-०७-२५

सही/-
ॲड. वाय. एस. भोपी

१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळ्यापुढे, पनवेल
मोबाईल : ९८२०२७३६९१

नवी मुंबईत घनकचरा व्यवस्थापन प्रभावी

अत्याधुनिक टो-गो वाहनाचा शुभारंभ

नवी मुंबई : बातमीदार

'टो-गो' अर्थात ट्रीटमेंट ऑफ वेस्ट ऑन द गो या युनिक वेस्ट मॅनेजमेंट कन्सेप्ट मुव्ही वेट वेस्ट कंपोस्टर या वाहनाचे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते विष्णुदास भावे नाट्यगृह येथे शुभारंभ करण्यात आला.

ऐरोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या प्रयत्नातून महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेंतर्गत याकरिता निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. लाहस ग्रीन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी 'मेड इन भारतच्या माध्यमातून 'ट्रीटमेंट ऑफ वेस्ट ऑन द गो' ही पर्यावरण पूरक अशी संकल्पना म्हणजेच टो-गो यांत्रिक वाहन रूपात साकारली आहे.

या उपक्रमांतर्गत ऐरोली विभागातील सोसायटींमधील

तीन हजार घरांमधून दैनंदिन दीड टन निर्माण होणारा ओला कचरा टो-गो वाहनामध्ये संकलन केल्यानंतर त्यावर वाहनातच प्रक्रिया करून खत तयार होणार आहे. वाहन हे नैसर्गिक इंधनावर (CNG वर) चालत असल्याने आणि त्याच्या प्रक्रियेसाठी सौर ऊर्जेचा वापर करत असल्याने टो-गो हे प्रदूषण विरहित वाहन आहे आणि निसर्गासाठी फारच सकारात्मक ठरणार आहे.

हा एक प्रकारचा खत प्रकल्प असला, तरी इतर प्रकल्पात होणारा यंत्रसामुग्रीचा मोठा आवाज व त्याचे दुष्परिणाम यात होणार नाही. टो-गोची आवाज विरहीत कार्यपद्धती पर्यावरणपूरक अशी भूमिका बजावते. टोगो ही ठिकठिकाणी जाऊन ओला कचरा गोळा करते. याचवेळी हा कचरा गाडीच्या मागील बाजूस असलेल्या पॅनलवर वेचण्यात येतो. ओल्या कचऱ्याव्यतिरिक्त इतर कचरा वेगळा करण्यात येतो व उरलेला ओला कचरा तेथेच असलेल्या हायड्रोलिक बास्केटमधून मशीनच्या श्रेडरमध्ये जाऊन यानंतर तेथेच त्याचे बारीक तुकडे होतात.

तेथून तो कचरा स्क्रू प्रेसमधे येतो. यात हा कचरा पिळला जाऊन त्यातील ओलावा व द्रवपदार्थ बाहेर काढला जातो आणि उरलेला चोथा पुढे डायजेस्टरमध्ये जातो. येथे थर्मोफिलिक बॅक्टेरियांसाठी अनुकूल आणि पोषक असे वातावरण निर्माण केले जाते. यासाठी अत्याधुनिक प्रणालीद्वारे सेन्सर्सच्या सहाय्याने विशिष्ट तापमान व आर्द्रता नियंत्रित केली जाते. यामुळे आठ ते बारा दिवसात या कचऱ्याचे रूपांतर खतात होते. ओल्या म्हणजे घनकचऱ्याचे खतात रूपांतर होण्यासाठी जरी आठ दिवस लागत असले, तरीदेखील यात दररोज कचरा टाकला जाऊ शकतो आणि निर्माण होणारे कंपोस्ट खतही आपल्याला रोजच्या रोज मिळू शकते.

खत निर्मिती प्रक्रियेकरिता लागणारी ऊर्जा मिळवण्यासाठी यात मुंबई आयआयटीचे पेटंट असलेले सोलार एलुमिनियम ट्यूबलर एअर हिटर हे तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वाहनाच्या इंजिनपासून मिळणारी ऊर्जा या प्रक्रियेसाठी वापरली जाते. कचरा उचलून झाल्यानंतर पार्किंगमध्ये वाहन उभे असताना विद्युत उर्जेवर हे वाहन खत निर्मितीची प्रक्रिया सुरू ठेवते. अशा पद्धतीने टो-गो हे यंत्र २४ तास खत निर्मितीचे कार्य करतच असते.

या यांत्रिक वाहनामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाला अधिक आधुनिकता लाभून ते आणखी प्रभावी होणार आहे.

डीपीएस फ्लेमिंगो तलावाजवळ सोनेरी कोल्ह्याचा अपघाती मृत्यू

नवी मुंबई : बातमीदार

नवी मुंबईतील नेरुळ येथील डीपीएस फ्लेमिंगो तलावाजवळील सर्व्हिस रोडवर रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास एका अज्ञात वेगाने येणाऱ्या वाहनाने एका सोनेरी कोल्ह्याला चिरडले. यात कोल्ह्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने पर्यावरण प्रेमींनी हळहळ व संताप व्यक्त केला आहे.

वाइल्डलाइफ वेल्फेअर असोसिएशन (डब्ल्यूडब्ल्यूए) च्या एका स्वयंसेवकाने सांगितले की, एका अज्ञात चारचाकी वाहनाने कोल्हाला पाठीवर धडक दिली त्यात कोल्हा चिरडला गेला. मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास त्यांना याबाबत माहिती मिळाली. पर्यावरणवाद्यांनी अशा घटना रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार यांनी खारफुटी-पाणथळ वन्यजीव वाचवण्यासाठी परिसरातील कोणत्याही रिअॅल इस्टेट विकासाला पूर्णपणे थांबवण्याची मागणी केली आहे. डीपीएस फ्लेमिंगो तलाव आणि त्याच्या सभोवतालच्या खारफुटींना अलीकडेच संवर्धन राखीव म्हणून घोषित करण्यात आले आहे आणि त्याच्या परिसरातील परिसर वन्यजीवांसाठी मोकळा सोडला पाहिजे, असे ते म्हणाले.

कुमार म्हणाले की, खारफुटी-वेटलँड झोनमध्ये विविध प्रकारचे स्थानिक आणि स्थलांतरित पक्षी, कोल्हे, सरपटणारे प्राणी राहतात.नवी मुंबई पर्यावरण संवर्धन सोसायटी (एनएमईपीएस) चे संदीप सरीन म्हणाले की, पाम बीच रोडच्या समांतर सर्व्हिस रोडवर वेगाने जाणारी वाहने एक मोठा धोका बनली आहेत. त्यांनी सर्व्हिस रोडवर त्वरित वेगाचे निर्बंध लादण्याची मागणी केली. अनेक वाहनचालक सिग्नल टाळण्यासाठी पाम बीच रोडवरून जलद वळण घेतात आणि बेदरकारपणे वाहन चालवणे हे रोजचे काम झाले आहे, असे सरीन यांनी दुःख व्यक्त केले.

परिसरातील अविरत बांधकामे आणि भूखंड भाड्याने देण्याची सिडकोची योजना जैवविविधतेला धोक्यात आणत असल्याचे ते म्हणाले. पर्यावरणवादी ज्योती नाडकर्णी म्हणाल्या की, नेरुळ तसेच खारघर येथे सोनेरी कोल्हे हिट-अँड-रनचे बळी ठरले आहेत. कार्यकर्त्यांनी कोल्हे वाचवण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या झोनमध्ये ठेवण्यासाठी कॉरिडॉर तयार करण्याची मागणी केली आहे.

वन विभागाच्या खारफुटी कक्षाने घणसोली येथील त्यांच्या आवारात पुरलेल्या मृतदेहाची जबाबदारी घेतली आहे, असे रेंज फॉरेस्ट ऑफिसर सुधीर मांजरेकर यांनी सांगितले.

नेरूळ येथे सीबीएसई माध्यमाची शाळा सुरू करावी -विशाल डोळस

नवी मुंबई : बातमीदार

नेरूळ सेक्टर-३०, भूखंड क्रमांक ८अ येथे नव्याने बांधण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या शाळा इमारतीमध्ये सीबीएसई माध्यमाची शाळा सुरू करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त आणि शिक्षण विभागाकडे केली आहे.

विशाल डोळस यांनी सांगितले की, सिवूड्स सेक्टर-५० (जुने) येथील सीबीएसई शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी पालकांना दोन-दोन वर्षे प्रतीक्षा करावी लागते. यामुळे विद्यार्थी आणि पालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. नेरूळ सेक्टर-३० येथील नवीन शाळा इमारतीत सीबीएसई माध्यमाची शाळा सुरू केल्यास विद्यार्थ्यांना तसेच पालकांना मोठा दिलासा मिळेल.

यामुळे परिसरातील शैक्षणिक गरजा पूर्ण होण्यास मदत होईल आणि सीबीएसई शिक्षणाची मागणी असलेल्या विद्यार्थ्यांना तात्काळ प्रवेशाची संधी उपलब्ध होईल, असेही डोळस यांनी नमूद केले.

या मागणीमुळे स्थानिक पालकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, महानगरपालिका प्रशासन आणि शिक्षण विभाग याकडे लक्ष लागले आहे. यामुळे परिसरातील पालक आणि विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील शिक्षणाचा लाभ घेता येईल, असे डोळस यांनी आपल्या मागणीपत्रात नमूद केले आहे.

स्थानिक नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दर्शवला असून, सीबीएसई शाळेमुळे शिक्षण क्षेत्रात मोठी प्रगती होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

ब्रह्माकुमारीजतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

उरण : बातमीदार

ब्रह्माकुमारीज राजयोग ध्यान केंद्र, उरण येथे रविवारी एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत ७५ टक्केपेक्षा अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

उरण येथील विविध शाळांमधून ३० हून अधिक विद्यार्थी आणि काही पालक या कार्यक्रमात सहभागी झाले. या उपक्रमाचे उद्दिष्ट होते. विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे, आत्मिक बळ प्रदान करणे, आणि जीवनात सकारात्मकता व एकाग्रता निर्माण करणे. कार्यक्रमाचे संचालन बीके प्रियांका बहन यांनी उत्साही व संयमित पद्धतीने केले.बीके तारा दीदी, जे उरण केंद्राच्या इंचार्ज आहेत, यांनी राजयोग ध्यान अभ्यासक्रमाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की ध्यानाच्या नियमित सरावाने मनाची एकाग्रता, आत्मविश्वास आणि शांतता यामध्ये वाढ होते. सीए बीके कुमुदिनी बहन यांनी डिजिटल डिटॉक्स विषयावर मार्गदर्शन केले.

पत्रकार दिनेश पवार यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत, पालकांशी संवाद ठेवण्याचे, त्यांचा आदर करण्याचे आणि त्यांच्या सोबत दररोज काही वेळ घालवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. सर्व विद्यार्थ्यांनी तीन मिनिटांचे राजयोग ध्यान अनुभवले, ज्यामध्ये त्यांनी अंतर्मनातील शांती, समाधान आणि सकारात्मक ऊर्जा अनुभवली. या अनुभूतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक स्थिरता आणि आनंद निर्माण झाला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना आणि पालकांना ब्रह्माकुमारीजचा सात दिवसांचा राजयोग ध्यान अभ्यासक्रम करण्यासाठी मुक्त आमंत्रण देण्यात आले.

हा कार्यक्रम केवळ गौरवाचा नव्हता, तर विद्यार्थ्यांसाठी नवीन दिशा, प्रेरणा आणि आत्मिक जागृती देणारा अनुभव ठरला. यशस्वी भवितव्यासाठी आत्मशक्ती, संयम, सद्विचार व मूल्याधारित जीवनशैली यांचे महत्व या उपक्रमातून प्रभावीपणे अधोरेखित झाले.

गव्हाण विद्यालयात पालक सहविचार सभा उत्साहात

पनवेल : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६मधील स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी व शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवत्ता वृद्धीसाठी इ.पाचवी व आठवीच्या वर्गनिहाय दोन दिवसीय शालेय पालक सभा २६ व २७ जून रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या.

पहिली पालक सहविचार सभा इयत्ता पाचवी या वर्गासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयाच्या अनुषंगाने घेण्यात आली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पालक सभेस विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील,रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, पालक प्रतिनिधी प्रशांत नाईक व माया

कोळी त्याचप्रमाणे ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, कृत्रिम बुद्धिमत्ता विषयाचे समुपदेशक शितलकुमार म्हात्रे, इयत्ता पाचवी च्या तिन्ही तुकड्यांचे वर्गशिक्षिक अनुक्रमे उज्ज्वला म्हात्रे, विशांत ठाकूर व संपदा म्हात्रे आदी उपस्थित होते. या वेळी संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे व पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांनीही पालकांना उद्बोधन केले.

इयत्ता पाचवी या वर्गातील नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना व पालकांना विद्यालयाचे उपशिक्षक विशांत ठाकूर यांनी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे व अभ्यासक्रमाचे स्वरूप विशद करून अधिकाधिक यशस्वीतेसाठी प्रोत्साहित केले. आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरुन विद्यार्थ्यांच्या बौद्धिक प्रगल्भतेसाठी नैसर्गिक बुद्धिमत्तेबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्तेचा देखील कौशल्यपूर्ण वापर करण्यासाठी नव्याने सुरू करण्यात आलेल्या 'कृत्रिम बुद्धिमत्ता' अर्थात (ए.आय.) या अभ्यासक्रमाबाबतची माहिती या विषयाचे समुपदेशक शितलकुमार म्हात्रे यांनी दिली.

सलग दुसऱ्या दिवशी इयत्ता आठवी या वर्गाची पालक सभा झाली. मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या सभेस पालक प्रतिनिधी शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष कुंदन मोकल, तृप्ती म्हात्रे उपस्थित होते.

विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे तसेच अन्य शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिक्षक पालक सहविचार सभेत विद्यालयाच्या प्राचार्य जोत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील,संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांनी स्पर्धा परीक्षेमध्ये गुणवत्ता वृद्धीसाठी उपाय योजना सुचवून उद्बोधन केले.

दगडी शाळा येथे मोफत छत्री वाटप व वृक्षारोपण

पनवेल : वार्ताहर

शिवसेना पनवेल शहर प्रभाग क्र १९ च्या वतीने पनवेल महानगरपालिका शाळा क्र २ दगडी शाळा येथे शिवसेना वर्धापनदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना मोफत छत्री वाटप करण्यात आले तसेच या निमित्ताने शाळेत वृक्षारोपण देखील करण्यात आले.

या वेळी जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे व महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या वेळी त्यांनी सांगितले की शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या उक्ती नुसार ऐंशी टक्के समाजकारण व वीस टक्के राजकारण तसेच पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनुसार आम्ही राजकीय क्षेत्रात नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असून त्याचाच हा एक भाग आहे. त्यानुसार शिवसैनिक राहुल गोगटे यांच्या प्रयत्नातून शाळेतील विद्यार्थ्यांना छत्री वाटप आणि पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून शाळेत वृक्षारोपण करण्यात आले आहे. यावेळी जिल्हा

सल्लागार - रमेश गुडेकर, जिल्हाप्रमुख - रामदास शेवाळे , महानगरप्रमुख - प्रथमेश सोमण, उपजिल्हाप्रमुख - परेश पाटील, उपमहानगर प्रमुख - महेश सावंत, शहरप्रमुख - प्रसाद सोनावणे ,उपशहरप्रमुख - शैलेश जगनाडे, सुजन मुसलोंडकर,विक्रम पाटणकर, मंदार काणे,आदी शिवसैनिक उपस्थित होते, तसेच पनवेल दगडी शाळेचे मुख्याध्यापक सुजित म्हात्रे, शिक्षक कमल तायडे ,वैभव पाटील,वैशाली सावळे, अर्चना माने, स्वाती पाटील यांनी शिवसेनेच्या या उपक्रमाबाबत आभार मानले. सदर छत्री वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम शिवसैनिक राहुल गोगटे यांच्या पुढाकाराने संपन्न झाला.

अ.पां. भोईर विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल तालुक्यातील अनंत पांडुरंग भोईर, दापोली पारगाव या हायस्कूलच्या इयत्ता दहावी १९८८-८९ बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रविवारी (दि.२९) उत्साहात झाला.

या कार्यक्रमाला उपस्थित प्रत्येकाने ३६ वर्षे मागे जाऊन एकमेकांच्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला. थोड्याच वेळात व्ही.व्ही पाटील यांचे आगमन झाले. सर्व मित्र-मैत्रिणींनी नतमस्तक होऊन आपापली ओळख करून दिली. प्रोफेसर राजेश गांगरे यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी स्वीकारली.

त्या शाळेच्या प्राचार्य पुष्पलता मॅडम यांचे भाषण झाले सर्वात शेवटी व्हीव्ही पाटील सरांचे भाषण झाले. व्हीव्ही पाटील सरांनी जोरदार विनोदी फटकेबाजी करत भाषण केले व जुन्या आठवणींना उजाळा दिला खरोखरच वातावरण अगदी शाळामय झाले होते. भाषणांचा कार्यक्रम पार पडल्यानंतर सर्वांनी अल्पोपहाराचा स्वाद घेतला.

सर्वांनी शाळेला एक चांगल्या रकमेची देणगी देण्याचा मानस व्यक्त केला आणि कार्यक्रमाचे सांगता झाली. कार्यक्रमाठी नरेंद्र पाटील, दत्ता म्हात्रे, संतोष पाटील, संतोष कांबळे, बळीराम दमडे, जगदीश भोईर, जितेंद्र मुंडकर, दीपक पाटील, दत्ता पाटील, राहुल मटकर, संगीता मोकळ, राजू पाटील आदींनी मोलाचे सहकार्य केले.

पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनतर्फे डॉक्टर डे साजरा

पनवेल : रामप्रहर वृत्त

दरवर्षीप्रमाणे यंदाही पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशन करून आपल्या डॉक्टरांसाठी व त्यांच्या फॅमिली साठी एकत्र येण्यासाठी दरवर्षी ऋणानुबंध या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते तसेच डॉ. वैभव मोकल यांच्या प्रयत्नाने यावर्षी डॉक्टर्स डेसुद्धा छाया रिसॉर्ट मानघर येथे साजरा करण्यात आला.

प्रथमता पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनची सर्वसाधारण सभेच्या आयोजन करण्यात आले. या सभेचे अध्यक्ष स्थान डॉ. मिलिंद टिपणीस यांनी भुषवले. वेगवेगळ्या विषयावर चर्चा करून सर्व ठराव सर्वांग ते मंजूर करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन संघटनेचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे सर आयसीटीसीचे डायरेक्टर डॉ. सलील पाटकर मिराकर हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ. राजेंद्र ढेरे केरला हॉस्पिटलचे मॅनेजिंग डायरेक्टर शुक्ला यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन तसेच छत्रपती शिवाजी महाराजांना

पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

आयसीटीसीचे डायरेक्टर डॉ. सलील पाटकर सलील पाटकर यांनी थोडक्यात माहिती सांगून आपले मनोगत व्यक्त केले तसेच मिरॅकलचे हॉस्पिटलचे डॉ. ढेरे यांनीसुद्धा उपस्थित सर्व डॉक्टर परिवारांना कार्यक्रमाच्या शुभेच्छा दिल्या. तेरणा हॉस्पिटलचे शुक्ला यांनी आमच्या हॉस्पिटल कम्युनिटी बेस आहे, कॉर्पोरेट नाही हे पटवण्याचा प्रयत्न केला सर्वात शेवटी मार्गदर्शक मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे सरांनी संघटनेबद्दल ऋणानुबंध कार्यक्रमाबद्दल थोडक्यात माहिती देऊन संघटनेला शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर तसेच माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे हेसुद्धा उपस्थित होते. दोघांच्या उपस्थितीत डॉक्टर डे चा केक कापण्यात आला त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सिंगिंग डान्सिंग वन एकट प्ले सादरीकरण झाले यावेळेस दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे सर्टिफिकेट तसेच सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले डॉक्टर वैभव मोकल यांनी आपल्या संघटनेबद्दल व तिच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती सर्व उपस्थित डॉक्टरांच्या फॅमिलीला सांगितली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व बोर्ड व कोर कमिटी मेंबर्स यांनी खूप मेहनत घेतली होती आलेल्या सर्व डॉक्टरांचे व फॅमिलीचे आभार डॉ. विवेक महाजन यांनी मानले.

‘सेंद्रिय शेतीत आधुनिक तंत्रज्ञान गरजेचे’

खालापूर पंचायत समितीमध्ये कृषी दिन साजरा

चौक : प्रतिनिधी

आरोग्य संपन्न शेती सेंद्रिय शेती विकास करताना आधुनिक तंत्रज्ञान वापरणे अत्यंत महत्त्वाचे आहे, शेती जपणे महत्वाचे ठरणार आहे, असे प्रतिपादन सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे यांनी काढले.

तालुका कृषि अधिकारी कार्यालय,खालापूर व पंचायत समिती, खालापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि दिन खालापूर पंचायत समितीच्या सभागृहात साजरा करण्यात आला. त्यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे बोलत होते. कृषी दिन १ जुलै रोजी हरितक्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त शासन स्तरावर साजरा केला जातो. त्याचेच औचित्य साधून आज पंचायत समिती सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शेती आणि माती वर निस्सिम प्रेम असणारे शेतकरी आजचा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करतात.

या वेळी कृषी अधिकारी यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना फळबाग लागवड अंतर्गत दोन हेक्टर पर्यंतच्या शेतकऱ्यांना आपल्या शेताच्या बांधावर तसेच पडीक जमिनीवर फळबाग लागवड करणे, रोजगार हमी योजनेचे रोजगार, यामध्ये आंबा काजू चिकू नारळ, बांबू. मोगरा सोनचाफा या फुल पिकांची लागवड,भाऊसाहेब फुंडकर. फळबाग लागवड, आपले सरकार पोर्टल वर अर्ज कसा करावा, अँग्रीस्टॅग याची माहिती व गरज व अन्य शेती विषयक शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. या वेळी आदिवासी शेतकरी बांधव यांना तूर पिक बी व अन्य बियाण्यांचे वाटप मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले.

तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर, कीर्ती लडकत, राजेंद्र कोळटक्के, नितीन महाडिक, चित्रा सामंत, अभिजित खैर, सुनील वराट यांच्यासह माजी उप सभापती गजानन मांडे,सरपंच बाळू वाघमारे, उप सरपंच देवेंद्र देशमुख, प्रशांत खांडेकर, प्रगतशील शेतकरी मच्छिंद्र पारठे, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी मांडल्या समस्या

दरम्यान, या वेळी खालापूर नगर पंचायत हद्दीत काही गावे गेल्याने त्यांना जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या योजनांचा लाभ मिळत नसल्याचे अनेक शेतकरी यांनी सांगितले. याबाबतचा प्रस्ताव शासन स्थरावर पाठवण्याची विनंती शेतकरी यांनी केली. तर नवीन उद्योग आणि औद्योगिक वसाहती निर्माण होत असल्याने शेतकरी यांची वाट अडविली जाते, अशी तक्रार खानाव येथील शेतकरी यांनी केली आहे.

रिस येथील रेशन दुकानदारावर कारवाई करण्याची मागणी

मोहोपाडा : प्रतिनिधी

रसायनी परिसरातील रिस येथील रेशन दुकानात मोठ्या प्रमाणात काळाबाजार होत असल्याचे उघड झाले आहे. रिस येथील रेशन दुकानदार प्रसाद मांडे हे महिन्यातून फक्त दोन दिवसच रेशनचे दुकान उघडत असल्याने एक हजार एकशे सत्तर लाभाथ्यापैकी काही ग्राहकांनाच धान्य मिळत असल्याच्या तक्रारी माजी उपसरपंच भूषण पारंगे यांच्याकडे आल्या.

याबाबत भूषण पारंगे यांनी खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण यांच्याकडे लेखी तक्रार केली असता तहसीलदार यांनी पुरवठा अधिकाऱ्यांना ताबडतोब रिस येथील रेशनिंगच्या दुकानावर पाठवले. यावेळी मोठ्या संख्येने ग्राहक उभे असल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांसमोर रेशनिंग दुकानदाराच्या तक्रारीचा पाढाच वाचला. सदर रेशन दुकानदार महिन्यातून फक्त दोनच दिवस दुकान उघडतो. पहिल्या दिवशी सर्वांना धान्य न मिळाल्याने दुसऱ्या दिवशी येणाऱ्या ग्राहकाला धान्य संपले असे सांगून पुढच्या महिन्यात येण्याचे सांगतो. पुढच्या महिन्यात गेल्यावर मागील महिन्यातील धान्य देत नाही. यावेळी भूषणशेठ पारंगे व सागर सुखदरे ,प्रशांत गायकवाड यांनी सदर रेशन दुकानदाराची चांगलीच कानउघाडणी गेली व उपस्थित ग्राहकांना धान्य देण्यास भाग पाडले.

या वेळी आलेल्या पुरवठा अधिकाऱ्यांनी रेशनिंग दुकानदार प्रसाद मांडे याच्या दुकानाची पाहणी केली असता दुकानामध्ये लाभाथ्यांच्या माहितीसाठी कोणताही बोर्ड लावला नाही, धान्यसाठा रजिस्टर ठेवले नाही. त्यामुळे या रेशनिंग दुकानात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे दिसून आले.

नागरीकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने भूषणशेठ पारंगे यांनी खालापूरचे तहसीलदार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. तसेच, तत्काळ उरणचे आमदार महेश बालदी यांच्याशीही संपर्क साधून त्वरित कारवाईची मागणी केली. आमदार महेश बालदी यांनीही तत्काळ प्रशासनाशी संपर्क साधून नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी हालचाली सुरू केल्या. या संयुक्त प्रयत्नांमुळे तहसील कार्यालयाने त्वरित कारवाई करत रेशन दुकानावर चौकशीसाठी अधिकृत टीम नेमली असून, सर्व लाभाथ्यांना महिन्यातील ३० ही दिवस रेशन वितरित करण्याचे आदेश तहसीलदारांनी दिले आहेत.

या कारवाई दरम्यान दिवसभर उपाशीपोटी रांगेत उभ्या असलेल्या महिलांबद्दल व नागरिकांबद्दल संवेदनशीलता दाखवत भूषण पारंगे यांनी त्यांच्या नाश्त्याची व्यवस्था म्हणून वडापाव व थंड पाण्याची सोय केली.

निवडक

अविनाश दांडेकर यांना श्रद्धांजली

मुरूड : शहरातील यशस्वी उद्योजक तथा संतोष बेकरीचे मालक अविनाश दत्तात्रय दांडेकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने नुकतेच निधन झाले. याबद्दल शिवसेना शहर शाखा मुरुडच्या वतीने रविवारी (दि.२९) जैन समाज हॉल बाजारपेठ येथे पदमश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या प्रमुख उपस्थितीत शोकाकुल वातावरणात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कै. अविनाश दांडेकर यांच्या प्रतिमेला डॉ. लहाने यांनी पूजन करून आदरांजली वाहिली. डॉ. लहाने म्हणाले की, अविनाश हा संजीवनी आरोग्य केंद्राचा सच्चा व मनमिळाऊ उमदया स्वभावाचा कार्यकर्ता काळाने हिरावुन नेला. ३० ते ५० या वयोगटात हार्ट अॅटकचे वाढते प्रमाण चिंतादायक आहे. अतिताण तणाव, वेळवर आहार या बाबींकडे लक्ष दिले पाहिजे तसेच दर सहा महिन्यांनी ईसीजी रिपोर्ट करावेत, असे आवाहन केले.

विनायक गुळवणी सेवानिवृत्त

माणगाव : खरवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या नूतन माध्यमिक विद्यालय खरवली विद्यालयाचे मुख्याध्यापक विनायक रघुनाथ गुळवणी आपल्या प्रदीर्घ ३७ वर्षांच्या सेवेनंतर ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. गणित व विज्ञान विषयाचे अध्यापन करणारे विनायक गुळवणी सर हे पेण तर्फे तळे गावचे सुपुत्र असून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात त्यांच्या भरीव योगदानाने ते ओळखले जातात. नूतन माध्यमिक विद्यालयाच्या खरवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने त्यांना सेवापुर्ती सत्कार व शुभेच्छा देण्यात आल्या. खरवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष महेंद्र मानकर, उपाध्यक्ष सुशील दसवते आदी या वेळी उपस्थित होते.

माणगाव : पंचायत समिती अंतर्गत असणाऱ्या एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प माणगावच्या नवनियुक्त बालविकास प्रकल्प अधिकारी अस्मिता बिर्जे यांचे केंद्र प्रमुख शंकर शिंदे, चारिझेन फाउंडेशन माणगावचे मार्केटिंग हेड राकेश पडवळ, समिती जंगम,स्नेहल जंगम यांनी स्वागत केले.

रायगड जिल्ह्याच्या प्राथमिक शाळांतील मुलांकरिता शिबिर

खोपोली : प्रतिनिधी

रायगड, पुणे व सातारा जिल्ह्यातील वंचित मुलांसाठी कॉम्बाइंड ॲक्टिव्हिटीज फॉर मॅक्सिमाइझ्ड लर्निंग कॅम्प हे व्यापक आणि राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण शिबिर पी अँड जी इंडियाने आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या सहयोगाने आयोजित करण्यात आले होते.

वाचन करणे शिकावे, आपले विचार तोंडी आणि लेखी स्वरूपात मांडता यावेत, तसेच मजबूत विश्लेषणात्मक व गणिती कौशल्ये आत्मसात करावीत यासाठी आयोजित करण्यात आले होते. रायगड, पुणे आणि सातारा सहित संपूर्ण महाराष्ट्रातील सुमारे ५४हजार युवक स्वयंसेवकांना एकत्रितपणे सहभागी करून घेतले गेले, ज्यांनी मिळून वंचित समुदायांतील ६.५

लाखांहून अधिक मुलांना शिकवले उपक्रमाबाबत ईनाक्षी देवा, प्रमुख – सीएसआर व कम्युनिकेशन्स यांनी अधिक माहिती दिली.

रायगड जिल्ह्यातील खोपोली (खालापूर) गावात, टाईडने शेकडो वंचित मुलांसाठी विशेष स्वच्छता जागरुकता कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेद्वारे टाईड आणि पी अँड जी शिक्षाने मुलांना स्वच्छ राहण्याच्या उत्तम सवयी शिकवल्या, जेणेकरून दररोजचा दिवस ताज्या व स्वच्छ सुरुवातीने सुरू होईल. घरोघरी जाऊन मुलांचे शालेय गणवेष गोळा केले आणि ते स्वच्छ धुऊन परत दिले, जेणेकरून मुले नवीन शैक्षणिक वर्ष उत्साहाने सुरू करू शकतील.

कार्यशाळेदरम्यान मुलांनी आपल्या पालकांसाठी खास हाताने बनवलेली कार्डे तयार केली, ज्यामधून त्यांनी आपल्या प्रेमाची आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आणि कार्यशाळेत शिकलेल्या स्वच्छतेच्या सवयींना आत्मसात करून त्यांचे काळजीपूर्वक पालन करण्याचे वचन दिले. शिबिर राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि महाविद्यालयांच्या मोठ्या सहकार्याने आयोजित करण्यात आले.

हे शिबिर पूर्णतः स्थानिक स्वयंसेवकांच्या नेतृत्वाखाली राबवले गेले,ज्यामध्ये हायस्कूलमधील विद्यार्थी, माता, कॉलेज विद्यार्थी, शिक्षक आणि इतर सामील होते. हे स्वयंसेवक आपल्या गावांमध्ये, मोहल्ल्यांमध्ये आणि शेजारील भागांमध्ये शिक्षण सत्र घेतात आणि मुलांना खेळावर आधारित शिक्षण क्रियाकलापांमध्ये गुंतवून त्यांची मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान कौशल्ये विकसित करण्याचे काम करतात. परिचयाचा हा शिक्षण मॉडेल आणि आपल्या समाजातील ज्येष्ठांकडून शिकण्याच्या सोयीमुळे निर्माण होणाऱ्या आत्मीयतेमुळे या उपक्रमाचा देशभरातील ५० लाखांहून अधिक मुलांवर सकारात्मक परिणाम झाला, ज्यामध्ये ४.५ लाखांहून अधिक स्वयंसेवक सहभागी झाले आणि त्यामुळे हा उपक्रम देशातील सर्वात मोठ्या समुदाय-आधारित शिक्षण उपक्रमांपैकी एक ठरला. तसेच या शिबिरासाठी विविध राज्य सरकारांच्या संस्थांशी भक्कम भागीदारी करण्यात आली.

लायन्स क्लब पोयनाडच्या अध्यक्षपदी गुरूनाथ माळी

अलिबाग : रामप्रहर वृत्त

लायन्स क्लब पोयनाडचे नवीन अध्यक्ष गुरुनाथ माळी चांगल्याप्रकारे पार पाडतील, असा विश्वास डिस्ट्रीक्ट ३२३१ ए२ चे पीएमजेएफ पीडीजी मानेश्वर नायक यांनी व्यक्त केला.

लायन्स क्लब पोयनाडचा सन २०२५-२६ वर्षासाठीचा इन्स्टॉलेशन आणि इंडक्शन समारंभ शुक्रवारी झाला. या समारंभात गुरुनाथ माळी यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. या वेळी प्रमुख पाहुणे मानेश्वर नायक यांनी इन्स्टॉलेशन अधिकारी म्हणून मार्गदर्शन केले, तर प्रवीण सरनाईक यांनी इंडक्शन अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाला पीएमजेएफ पीडीजी मुकेश तनेजा आणि झोन चेअरपर्सन विकास पाटील आदी उपस्थित होते.

या समारंभात नूतन संचालक मंडळाची घोषणा करण्यात आली. यामध्ये गुरुनाथ माळी यांनी अध्यक्ष, विनोद पाटील यांनी पहिले उपाध्यक्ष, प्रगती सिनकर यांनी सचिव, रत्नाकर सूर्यवंशी यांनी सहसचिव, नीलम माळी यांनी खजिनदार आणि सुधीर पाटील यांनी सह-खजिनदारपदाची जबाबदारी स्वीकारली. याव्यतिरिक्त लायन प्रदीप सिनकर (सदस्यत्व चेअरपर्सन), दिलीप गाटे (एलसीआयएफ को-ऑर्डिनेटर), विकास पाटील (सेवा चेअरपर्सन), अरविंद अग्रवाल (क्लब डमिनिस्ट्रेटर), सुनील काकडे (टेमर), महेंद्र पाटील (टेल ट्विस्टर) आणि मनोहर चवरकर (मार्केटिंग आणि कम्युनिकेशन चेअरपर्सन) यांचाही समावेश आहे. प्रमोद पाटील, सतीश पाटील, मनीष अग्रवाल, प्रमोद राऊत, प्रमोद पाटील, ममता अग्रवाल, कौस्तुभ जोशी, मनोज एस. जैन आदींनी संचालक म्हणून जबाबदारी स्वीकारली.

ॲड. साळवी प्रवक्तेपदी

रोहे : अष्टमी येथील युवा

कार्यकर्ते, अभिनव रोहा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड हर्षद राम साळवी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रोहा प्रवक्ते पदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते देण्यात आले. या नियुक्तीनंतर साळवे यांचे अभिनंदन होत आहे.

हर्षद साळवी यांना कला क्रीडा शैक्षणिक आरोग्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात काम करण्याचा दांडगा अनुभव आहे. किली क्षेत्रात पदवी असल्याने त्यांना कायद्याचे प्रचंड ज्ञान आहे. त्यांच्या नियुक्तीने पक्षाची बाजू मांडण्यासाठी एका उमदे नेतृत्वाची जोड मिळण्याने सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे.

संजीवनी आरोग्य केंद्रास हीमो डायलिसिस मशीन प्रदान

मुरूड : प्रतिनिधी

मुरूड कुंभार आळीत कॅनडास्थित समाजसेवक सादिक हुसेन पेशइमाम यांनी नुकतीच कै. अंजनाबाई पुंडलिकराव लहाने हेल्थ अँड वेल्फेअर सेंटरला साडे आठ लाख रुपये किमतीचे हीमो डायलेसीस मशीन सुपुर्द केले.

या वेळी संजीवनी आरोग्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पदमश्री डॉ. तात्याराव लहाने, प्रसिद्ध नेत्र शल्य चिकित्सक डॉ. रागिणी पारेख, संजीवनीचे विभाग प्रमुख डॉ. मकबुल कोकाटे, कार्याध्यक्ष विजय सुर्वे, नगमाना खानजादे, वासंती उमरोटकर, दीपाली दिवेकर, नितीन अंबुर्ले, मंगेश दांडेकर, प्रमोद भायदे, आदेश दांडेकर, किर्ती शहा, अजित गुरव आदी उपस्थित उपस्थित होते

या वेळी हीमो डायलिसिस मशीनचा शुभारंभ करताना संस्थापक अध्यक्ष डॉ. लहाने म्हणाले की, संजीवनी आरोग्य केंद्राला आजपर्यंत अनेक दानशूर व्यक्तिंनी रुग्ण सेवेसाठी विविध उपयुक्त उपकरणे देऊन महत्वपूर्ण भूमिका निभावली आहे.

निसर्ग फुलविण्याचा बोरघरच्या तरुणांचा ध्यास

रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण

धाटाव : प्रतिनिधी

निवी, तळाघर विभागात ध्येयवेडी, निसर्गप्रेमी तरुण तयार होत आहेत. निवी हद्द रस्ता दुतर्फा विविध प्रकारच्या गर्द झाडांनी व्यापला आहे. तळाघर गावातील तरुणांनीही मोठ्या प्रमाणात रस्ता दुतर्फा वृक्षारोपण केले, त्यात अवघा निसर्ग फुलविणाऱ्या बोरघरच्या तरुणांनी घेतलेला ध्यास खूपच वाखाण्याजोग आहे.

आता भुवनेश्वर ते बोरघर रस्ता दुतर्फा पूर्णतः झाडांनी गर्द झाला. बोरघर गावाच्या प्रदेशाद्वारासमोरील रस्ता दुतर्फा दृश्य अत्यंत विहंगम दिसत आहे हे सुखद चित्र असतानाच रविवारी वृक्षप्रेमी स्वप्नील भगत, परशुराम माने, अक्षय भगत व अन्य तरुणांच्या सहयोगातून रस्ता दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले. बळीराजा फांऊडेशनच्या उपकृत विविध कार्यातून प्रेरीत होऊन विभागातील तरुण शेती, सर्वथा निसर्गकडे आकर्षिक होत आहे हे

अधोरेखीत झाले तर भविष्यात सातत्यपूर्ण राहणाऱ्या कालव्याच्या पाण्यावर अनेक प्रकारच्या हिरवळीची क्रांती घडेल असेच सकारात्मक वातावरण तयार झाले आहे.

मागील आठवडयात तळाघर येथील बहुसंख्य तरुणांनी रस्ता दुतर्फा वृक्षारोपण केले. त्यापाठोपाठ रविवारी बोरघर येथील वृक्षप्रेमी तरुणांनी बोरघर ते लांढर मध्यान्ह हद्द रस्ता दुतर्फा भव्यदिव्य वृक्षारोपण केले. या वेळी बळीराजा फांऊडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव, तळाघर ग्रामपंचायतीचे सदस्य संजय भगत, सचिव दीपक भगत व ग्रामस्थ उपस्थित होते.

वृक्षप्रेमी स्वप्निल भगत, परशुराम माने व तरुणांनी वृक्षारोपणाचा अविरतपणे पुढाकार घेतला. बिट्टी, बाहवा, प्लिटोफार्म व अन्य जातीची झाडे लावून वृक्षारोपण परंपरा कायम ठेवली. परशुराम माने यांनी पूर्णतः रस्ता दुतर्फा आम्ही झाडे लावून हिरवेगार करणार आहोत असे सांगत कालव्याला अखंडपणे पाणी राहू द्यात, अशी भावना माने यांनी व्यक्त केली.

राजेंद्र जाधव यांनी उपस्थित वृक्षप्रेमी तरुणांना निसर्ग, झाडांचे महत्त्व सांगत संत साहित्य, इतिहासातील महापुरुषांचे वृक्षप्रेम, जंगल संवर्धनाचे दाखले दिले. निसर्ग अधिक सक्षमतेने टिकवला नाही, वाढवला नाही तर संबंध प्राणी मात्रांचे जगणे मुश्किल होईल असे सांगत बळीराजा फाऊंडेशन निसर्ग, शेती क्षेत्रावर विशेष काम करत आहे. त्यात मुख्यतः तरुणांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जाधव यांनी केले. आभार स्वप्नील भगत यांनी मानले.

रोहा प्राथमिक शिक्षक समितीच्या सभेत विचारविनिमय

रोहे : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा रोहाची शैक्षणिक वर्ष २०२५-२६मधील पहिली सभा शनिवारी झाली.

या वेळी संघटनेच्या माध्यमातून गेल्या दोन ते तीन महिन्यात शिक्षकांच्या सोडवलेल्या प्रश्न संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली. या सभेत पदाधिकारी व सभासदांनी मांडलेल्या प्रश्नांची दखल घेऊन संबंधित तालुका शाखा रोहाच्या वतीने प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही देण्यात आली.

या सभेसाठी राज्य कार्यकारणी पदाधिकारी अनिल नागोठकर, कोकण विभाग महिला आघाडी सदस्य विद्या रोहेकर, तालुका शाखा रोहाचे अध्यक्ष ब्रिजेश भादेकर, रोहा तालुका महिला आघाडी प्रमुख वैशाली सलागरे, सचिव संजय बागडे, रोहा तालुका शिक्षक नेते संतोष खलापकर, कार्याध्यक्ष जयेश भोईर, उपाध्यक्ष लीना सुर्वे, उपाध्यक्ष मनिषा पाबरेकर, उपाध्यक्ष दीपक पाबरेकर, उपाध्यक्ष विजय धोत्रे, प्रसिद्धी प्रमुख संतोष वेटकोळी, विभाग प्रमुख निवास थळे, विभाग प्रमुख दिनेश वाघमारे, जयेंद्र डोलकर, सुरेश तवर आदी शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.

पुनरागमनासाठी टीम इंडिया सज्ज

आजपासून भारत वि. इंग्लंड दुसरी कसोटी

बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था

भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात लीड्सच्या हेडिंग्ले मैदानावर भारतीय संघाला पराभवाला सामोरे जावे लागले होते. आता दोन्ही संघ २ जुलैपासून बर्मिंगहॅमच्या एजबॅस्टन मैदानावर दुसऱ्या कसोटीसाठी सज्ज झाले आहेत.

दुसऱ्या कसोटीसाठी इंग्लंडने पहिल्या कसोटीतील संघच कायम ठेवला आहे. स्टार वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरला स्थान देण्यात आलेले नाही. त्यामागे दुखापत हे कारण नसून कौटुंबिक आपत्कालीन परिस्थिती असल्याचे सांगितले जात आहे.

गेल्या आठवड्यात आर्चरने चार वर्षांत प्रथमच कौंटी चॅम्पियनशिपमध्ये ससेक्स संघाकडून डरहॅमविरुद्ध प्रथम श्रेणी सामना खेळला होता. आता आर्चर तिसऱ्या कसोटीतून संघात पुनरागमन करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दुसरीकडे पहिल्या कसोटीतील पराभवानंतर भारतीय संघ व्यवस्थापनाकडून अंतिम ११ खेळाडूंमध्ये बदल करण्याची शक्यता आहे. भारत कदाचित दोन फिरकी गोलंदाजांसह खेळू शकतो आणि जसप्रीत बुमराह तंदुरुस्त असला तरीही त्याच्या खेळण्याबाबत अंतिम निर्णय टॉसपूर्वी घेतला जाईल असे समजते. सध्या संघात रवींद्र जडेजा हा अष्टपैलू खेळाडू आहे. त्याच्या जोडीला चायनामन कुलदीप यादव मुख्य फिरकीपटू म्हणून भूमिका बजावू शकतो. त्याचप्रमाणे बुमराहच्या अनुपस्थित अर्शदीप सिंग, आकाशदीप, नितीशकुमार रेड्डी यांचीही नावे चर्चेत आहेत. आता अंतिमतः कुणाला संघात स्थान मिळते हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

भारतासाठी एजबॅस्टनवरील आजवरची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. भारताने या मैदानावर आतापर्यंत एकही कसोटी सामना जिंकलेला नाही. येथे खेळलेल्या आठ सामन्यांपैकी सात सामन्यांत संघाला पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे आगामी सामन्यात मालिका बरोबरीत आणण्याच्या उद्देशाने मैदानात उतरणाऱ्या शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला इतिहासाला आव्हान द्यावे लागणार आहे.

पावसाचे सावट

दुसऱ्या कसोटीआधी दोन्ही संघांसाठी टेन्शन वाढवणारी बातमी समोर येत आहे, कारण या सामन्यातही पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. 'ॲक्यूवेदर'ने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार सामन्यातील पाचपैकी तीन दिवस पाऊस हजेरी लावू शकतो. सामन्यातील पहिला दिवस म्हणजे २ जुलैला पाऊस पडण्याची शक्यता ८४ टक्के इतकी असणार आहे, तर सामन्याच्या चौथ्या दिवशी म्हणजे ५ जुलैला आणि शेवटच्या दिवशी म्हणजे ६ जुलैला पाऊस पडण्याची शक्यता ही ६०-६० टक्के आहे. सामन्यातील दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी पाऊस पडणार नाही, मात्र ढगाळ वातावरण असेल.

शरीरसौष्ठवपटू सुभाष पुजारी यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदके

पनवेल : वार्ताहर

अमेरिकेतील आलाबामा बरमिंगहम येथे नुकतीच वर्ल्ड पोलीस ॲण्ड फायर गेम २०२५ स्पर्धा झाली. या स्पर्धेत बॉडी बिल्डिंगमध्ये नवी मुंबई विभागातील पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी दोन सुवर्णपदके पटकाविली.

शरीरसौष्ठवपटू सुभाष पुजारी यांनी १७२ सेंमी उंची गटात आणि मेन फिजिक या प्रकारामध्ये सुवर्णपदक जिंकले. यासह त्यांनी नवी मुंबई व महाराष्ट्र पोलीस दलाचे तसेच देशाचे नाव उंचावून भारताचा तिरंगा अभिमानाने फडकविला.

या स्पर्धेत ७६ देशातील संघांनी सहभाग नोंदविला. पुजारी हे या स्पर्धेसाठी दररोज सहा तास मिस्टर ऑलिम्पिया सुनीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत होते. त्यांनी आतापर्यंत १० आंतरराष्ट्रीय पदके मिळवलेली आहेत. त्यांना नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, ठाणे शहर सह पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक, डायल ११२ नवी मुंबईच्या पोलीस अधीक्षक प्रीती टिपरे, पत्नी रागिणी पुजारी, आनंद गुप्ता व विवेक गुप्ता, डॉ. कनिष्क जैन, डॉ. असीम माथन, सुदर्शन खेडकर, ऋषी पेणकर विशेष सहकार्य लाभले.

नव्या यशाबद्दल पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, अप्पर पोलीस महासंचालक निखिल गुप्ता (कायदा व सुव्यवस्था), श्रीकृष्ण प्रकाश (प्रशासन), विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) अभिषेक त्रिमुखे यांच्यासह पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकारी, सहकारी मित्र, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी सुभाष पुजारी यांचे अभिनंदन केले.

मुशीर खानचे इंग्लंडमध्ये दमदार शतक

लंडन : वृत्तसंस्था

मुंबई क्रिकेट असोसिएशनचा संघ पुढील एका महिन्यासाठी इंग्लंड दौऱ्यावर असणार आहे. या संघात सरफराज खानचा धाकटा भाऊ मुशीर खानचादेखील समावेश आहे. २० वर्षीय मुशीरने आपल्या पहिल्याच सामन्यात दमदार शतकी खेळी केली आहे.

मुशीरने मुंबई क्रिकेट असोसिएशन विरुद्ध नॉटिंघमशायर सेकंड इलेव्हन यांच्यात झालेल्या सामन्यात १२७ चेंडूंचा सामना केला आणि १४ चौकारांच्या मदतीने दमदार शतकी खेळी केली. या खेळीसह त्याने दाखवून दिले की, तो भारतासह परदेशातही आपल्या फलंदाजीचा ठसा उमटवू शकतो.

मुंबई क्रिकेट असोसिएशनचा उदयोन्मुख खेळाडूंचा संघ एका महिन्यासाठी इंग्लंड दौऱ्यावर आहे. यादरम्यान मुंबईचा संघ इंग्लंडमधील क्लब्ससोबत पाच दोन दिवसीय आणि चार एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. मुंबईचे सामने हे इंग्लंडमधील वॉर्सेस्टरशर आणि ग्लुस्टरशरसारख्या संघाविरुद्ध होणार आहेत. यामध्ये युवा खेळाडूंना आपल्या गोलंदाजी आणि फलंदाजीने छाप सोडण्याची संधी असणार आहे.

सराफराज खानचा धाकटा भाऊ असलेल्या मुशीर खानला प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये फार सामने खेळण्याची संधी मिळालेली नाही, पण कमी सामन्यांमध्येच त्याने आपली छाप सोडली आहे. मुंबईकडून खेळताना त्याने नऊ सामन्यांमध्ये ७१६ धावा केल्या आहेत. यारम्यान त्याने एक शतक आणि तीन अर्धशतके झळकावली आहेत, तर गोलंदाजी करताना त्याने आाठ गडी बाद केले आहेत.

'बंगळुरूत चेंगराचेंगरीला आरसीबीच जबाबदार'

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

पहिल्यांदाच आयपीएल विजेतेपद जिंकल्यानंतर झालेल्या विजयोत्सवामुळे झालेल्या चेंगराचेंगरीसाठी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या व्यवस्थापनालाच जबाबदार धरण्यात आले आहे. ४ जून रोजी या घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला होता.

केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण लवादाने म्हटले आहे की, बंगळुरूमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीसाठी आरसीबी प्रथमदर्शनी आरोपी असल्याचे दिसून येते. शिवाय न्यायाधिकरणाने स्पष्टपणे म्हटले आहे की कमी वेळात अचानक सुरक्षा व्यवस्था करण्यासाठी पोलिसांकडे अलाद्दीनचा जादूचा दिवा नव्हता.

यशस्वी जैस्वालला खुणावतोय ब्रॅडमन यांचा विक्रम

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

बर्मिंगहॅमच्या मैदानावर पुन्हा एकदा उतरेल, तेव्हा सर्वांच्या नजरा युवा फलंदाज यशस्वी जैस्वालवर खिळलेल्या असतील. जैस्वालची कसोटी क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्धची कामगिरी लक्षवेधी ठरली आहे. मागील सामन्यातही त्याने शानदार शतक झळकावले होते, परंतु त्याचे हे शतक संघाला विजय मिळवून देऊ शकले नाही. दरम्यान, आगामी सामन्यात जैस्वालची बॅट तळपल्यास तो क्रिकेटविश्वातील महान फलंदाज सर डॉन ब्रॅडमन यांचा एक मोठा विक्रम मोडू शकतो.

यशस्वी जैस्वालने आतापर्यंत २० कसोटी सामन्यांच्या ३८ डावांमध्ये ५२च्या सरासरीने १९०३ धावा केल्या आहेत. त्याच्या नावावर पाच शतके आणि १० अर्धशतके जमा आहेत. विशेष म्हणजे जैस्वालने आपल्या एकूण धावांपैकी ८१७ धावा केवळ इंग्लंडविरुद्धच केल्या आहेत. त्याने सर्वाधिक कसोटी सामनेही याच संघाविरुद्ध खेळले आहेत. आता पुढील कसोटीतच इंग्लंडविरुद्ध आपल्या एक हजार धावा पूर्ण करण्याची सुवर्णसंधी जैस्वालकडे आहे.

इंग्लंडविरुद्ध एक हजार कसोटी धावा पूर्ण करण्यासाठी जैस्वालला केवळ १८३ धावांची आवश्यकता आहे. इंग्लंडविरुद्ध सर्वात जलद एक हजार कसोटी धावा पूर्ण करण्याचा विक्रम ऑस्ट्रेलियाचे माजी महान फलंदाज सर डॉन ब्रॅडमन यांच्या नावावर आहे, जो अद्याप अबाधित आहे. ब्रॅडमन यांनी इंग्लंडविरुद्ध केवळ १३ डावात ही कामगिरी केली होती.

जैस्वालने इंग्लंडविरुद्ध आतापर्यंत ११ कसोटी डाव खेळले आहेत. म्हणजेच जर पुढील सामन्याच्या पहिल्या डावातच जैस्वालने १८३ धावा केल्या, तर तो केवळ १२ डावांमध्ये एक हजार धावा पूर्ण करून ब्रॅडमन यांचा विक्रम मोडेल, मात्र जर पहिल्या आणि दुसऱ्या डावात मिळून जैस्वालने या १८३ धावा केल्या, तर तो त्याचा १३ वा डाव असेल. अशा परिस्थितीत तो डॉन ब्रॅडमन यांना मागे टाकू शकणार नाही, पण त्यांच्या विक्रमाची बरोबरी नक्कीच साधेल.

इंग्लंडच्या युवा संघाचा विजय

नॉथम्प्टन : वृत्तसंस्था

भारताचा १९ वर्षांखालील संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. या मालिकेतील दुसरा सामना नॉथम्प्टनच्या मैदानावर झाला, ज्यात यजमना संघाने विजय मिळवला.

या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. भारतीय संघाकडून आयुष म्हात्रेला हवी तशी सुरुवात करता आली नाही. आयुष पहिल्याच चेंडूवर माघारी परतला. त्यानंतर वैभव सूर्यवंशीने विहान मल्होत्रासोबत मिळून डाव सावरला. विहानने ६८ चेंडूंचा सामना करत ४९ धावांची खेळी केली, तर वैभवने अवघ्या ३४ चेंडूत ४५ धावा चोपल्या. राहुल कुमारने ४७ आणि कनिष्क चौहानने ४५ धावा केल्या. भारतीय संघाचा पहिला डाव ४९ षटकात २९० धावांवर आटोपला.

इंग्लंडला हा सामना जिंकण्यासाठी २९१ धावांची गरज होती. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या इंग्लंडकडून कर्णधार थॉमस रेवने अवघ्या ८९ चेंडूंचा सामना करीत १६ चौकार आणि सहा षटकारांच्या साहाय्याने १३१ धावांची खेळी केली. रॉकी फ्लिंटॉफने ६८ चेंडूंचा सामना करत ३९ धावा केल्या. भारतीय संघाने दिलेले आव्हान इंग्लंडने शेवटच्या षटकात पूर्ण करत विजयाची नोंद केली.

'कॅप्टन कूल' आता धोनीचा ब्रँड!

टोपण नावाचे घेतले पेटंट

चेन्नई : भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीने आता आपल्या 'कॅप्टन कूल' या प्रसिद्ध टोपण नावावर कायदेशीर हक्क प्रस्थापित केला आहे. धोनीने हे नाव ट्रेडमार्क म्हणून नोंदवण्यासाठी अर्ज केला होता, जो आता स्वीकारण्यात आला आहे. त्यामुळे यापुढे 'कॅप्टन कूल' हे केवळ टोपण नाव नसून धोनीचा अधिकृत ब्रँड बनला आहे.

धोनीने हा ट्रेडमार्क विशेषतः क्रीडा प्रशिक्षण, कोचिंग सेवा आणि प्रशिक्षण केंद्रांशी संबंधित व्यावसायिक वापरासाठी मिळवला आहे. ट्रेड मार्क्स रजिस्ट्री पोर्टलवर उपलब्ध माहितीनुसार धोनीचा अर्ज स्वीकारण्यात आला असून तो १६ जून रोजी अधिकृत ट्रेडमार्क जर्नलमध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे. मैदानावर अत्यंत तणावाच्या क्षणीही शांत आणि संयमी राहण्याच्या त्याच्या वृत्तीमुळे चाहते आणि समालोचकांनी त्याला 'कॅप्टन कूल' हे नाव दिले होते.

विराटचा पुतण्या आणि सेहवागचे दोन्ही लेक दिल्ली प्रीमियर लीगमध्ये

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

दिल्ली प्रीमियर लीगच्या पुढील हंगामाचा लिलाव २ आणि ३ जुलै रोजी होणार आहे आणि दिल्लीचे अनेक उदयोन्मुख खेळाडू यात सहभागी होताना दिसतील.

या खेळाडूंमध्ये एक नाव आहे आर्यवीर कोहली, जो भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीचा पुतण्या आहे. आर्यवीर हा त्याचा काका विराटसारखा फलंदाज नाही, तर एक फिरकीपटू आहे. तो पश्चिम दिल्ली क्रिकेट अकादमीमध्ये विराट कोहलीचे प्रशिक्षक राजकुमार शर्मा यांच्याकडून प्रशिक्षण घेतो. आर्यवीर कोहलीला लिलावाच्या सी श्रेणीत स्थान देण्यात आले आहे.

लक्षवेधक गोष्ट म्हणजे या वेळी टीम इंडियाचा माजी विस्फोटक फलंदाज वीरेंद्र सेहवागचे दोन्ही लेक आर्यवीर आणि वेदांत सेहवाग हेही या लीगमध्ये दिसणार आहेत. डीपीएलच्या बोलीसाठी या दोघांचीही नावे निवडण्यात आली आहेत. आर्यवीर सेहवागच्या मोठ्या मुलाचं नावे आहे, जो १७ वर्षांचा आहे. सेहवागचा मोठा लेक दिल्लीच्या अंडर-१९ संघाचा भाग आहे आणि हल्लीच त्याने मेघालयविरूद्ध २९७ धावांची विस्फोटक खेळी केली होती. या खेळाडूला दिल्ली प्रीमियर लीगच्या बी कॅटेगरीमध्ये ठेवण्यात आले आहे. सेहवागचा दुसरा मुलगा वेदांत सेहवाग यालाही बी कॅटेगरीमध्ये ठेवण्यात आले असून तो दिल्लीच्या अंडर-१७ संघाचा भाग आहे. वेदांत एक ऑफस्पिनर आहे.

दिल्ली प्रीमियर लीगमध्ये यंदा दोन नवे संघ खेळणार आहेत. यामध्ये ईस्ट दिल्ली रायडर्स, नॉर्थ दिल्ली स्ट्रायकर्स, वेस्ट दिल्ली लायन्स, साउथ दिल्ली सुपरस्टार्स, ओल्ड दिल्ली-सिक्स आणि सेंट्रल दिल्ली किंग्ज यांचा समावेश आहे. या वेळी आउटर दिल्ली आणि नवी दिल्ली फ्रँचायझीदेखील मैदानावर दिसतील.

ऋषभ पंतला विराटचा विक्रम मोडण्याची संधी

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान सुरू असलेल्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा कसोटी सामना बर्मिंगहॅमच्या मैदानावर रंगणार आहे. या सामन्यात ऋषभ पंतकडे एजबस्टनच्या मैदानावरील विराट कोहलीचा मोठा रेकॉर्ड मोडून काढण्याची संधी असणार आहे.

विराट कोहली आपल्या कसोटी कारकिर्दीत एजबॅस्टनच्या मैदानावर केवळ दोन सामने खेळू शकला आहे. या सामन्यांत विराटने २३१ धावा केल्या आहेत. दुसरीकडे ऋषभ पंतने आतापर्यंत या मैदानावर फक्त एकच कसोटी सामना खेळला आहे. त्या एका कसोटीत पंतने २०३ धावा केल्या आहेत. यात पंतने एक शतकही झळकावले असून त्याची सर्वोच्च धावसंख्या १४६ आहे. या मैदानावर भारतीय फलंदाज म्हणून सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत पंत विराटपेक्षा केवळ २८ धावांनी मागे आहे. त्यामुळे आगामी सामन्यात तो हा विक्रम मोडू शकतो.

खेळासाठी स्थलांतर आणि पालकांचे प्रोत्साहन!

बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर विजेत्या आयुष शेट्टीची यशोगाथा

न्यूयॉर्क : वृत्तसंस्था

भारताचा युवा बॅडमिंटनपटू आयुष शेट्टीने यूएस ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कॅनडाच्या ब्रायन यांगचा थेट सेटमध्ये पराभव करून विजेतेपद पटकावले. ही त्याच्या कारकिर्दीतील आतापर्यंतची सर्वात मोठी कामगिरी आहे. या दमदार कामगिरीमुळे तो भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा पुरुष एकेरी खेळाडू बनला आहे.

आयुषने वयाच्या आठव्या वर्षी बॅडमिंटन खेळाला सुरुवात केली. प्रारंभी त्याने करकळा आणि मंगळुरू येथे स्थानिक प्रशिक्षक सुभाष आणि चेतन यांच्याकडून प्रशिक्षण घेतले. वयाच्या १२व्या वर्षी त्याला अधिक चांगले प्रशिक्षण मिळावे यासाठी त्याच्या कुटुंबाने बंगळुरूला स्थलांतर केले. आई-वडिलांनी नेहमीच त्याच्या खेळाला प्राधान्य दिले. बंगळूर येथील प्रकाश पदुकोण अकादमीमधील प्रशिक्षणामुळे सर्वांगीण खेळात त्याची लक्षणीय प्रगती दिसून येत आहे.

अमेरिकेच्या आयोवा राज्यातील काउन्सिल ब्लफ्स कोर्टवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात २० वर्षीय आयुष शेट्टीने आक्रमक खेळ दाखवत २१-१८, २१-१३ अशा फरकाने सामना आपल्या नावे केला. ब्रायन यांगने सामना टिकून राहण्याचा प्रयत्न केला, पण आयुषच्या आक्रमक खेळीसमोर त्याचा टिकाव लागला नाही.

दरम्यान, महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात भारताची तन्वी शर्मा उपविजेती ठरली. १६ वर्षीय तन्वीने उत्कृष्ट खेळ सादर केला, परंतु तिला अमेरिकेच्या अव्वल मानांकित बेवेन झांगकडून तीन गेमपर्यंत चाललेल्या सामन्यात पराभव पत्करावा लागला. आपल्या पहिल्या वर्ल्ड टूर फायनलमध्ये गैरमानांकित तन्वीने पूर्ण ताकदीनिशी खेळ केला, पण ४६ मिनिटे चाललेल्या या सामन्यात तिला ११-२१, २१-१६, १०-२१ असा पराभव स्वीकारावा लागला.

अझहर महमूद पाकिस्तानचा नवा प्रशिक्षक

कराची : वृत्तसंस्था

पाकिस्तानी संघाला कसोटी क्रिकेटमध्ये नवीन प्रशिक्षक मिळाला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) माजी अष्टपैलू खेळाडू आणि राष्ट्रीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक अझहर महमूद यांची कसोटी संघाचे कार्यकारी मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली.

अझहर महमूद यांनी आकिब जावेद यांची जागा घेतली आहे. महमूद यांनी संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक आणि सहाय्यक मुख्य प्रशिक्षक म्हणून खूप काळ काम केले आहे. त्यांच्यासमोर पहिले मोठे आव्हान म्हणजे या वर्षी ऑक्टोबरमध्ये पाकिस्तानमध्ये होणारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन कसोटी सामन्यांची मालिका असेल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com